भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३

(सन १९७३ चा अधिनियम क्रमांक ४६)

[३१ मे १९९९ रोजी यथाविद्यमान]

# The Foreign Exchange Regulation Act, 1973

(Act No. 46 of 1973)

[*As in force on the 31st May 1999*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००१

[किंमत : रु. ९.००]

## प्रास्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मे १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दि फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन ॲक्ट, १९७३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण भाग बारा, अनुभाग १, खंड १० अंक २ दिनांक २६ ऑक्टोबर १९९९ यात पृष्ठ १५१ ते १८४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २६ ऑक्टोबर १९९९.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

---

## *PREFACE*

This edition of the Foreign Exchange Regulation Act, 1973, as on the 31st October 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraorainary Part XII, Section 1, No. 2 Vol. 10, dated 26th October 1999 on pages 151 to 184.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
Date : 26th October 1999.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३

## कलमांचा क्रम

कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती व प्रारंभ.
२. व्याख्या
३. सक्त वसुली अधिकाऱ्यांचे वर्ग.
४. सक्त वसुली अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांच्या शक्ती.
५. सक्त वसुली संचालकांची किंवा अन्य बजावणी अधिकाऱ्याची कार्ये सोपविणे.
६. विदेशी चलनाचे प्राधिकृत विक्रेते.
७. नाणेवटी.
८. परकीय चलनासंबंधीच्या कार्यवाहीवरील निर्बंध.
९. प्रदानांवरील निर्बंध.
१०. अवरुद्ध लेख.
११ व १२. [निरसित].
१३. विवक्षित चलनाच्या व सोन्या-चांदीच्या आयातीवरील व निर्यातीवरील निर्बंध.
१४. केंद्र शासनाकडून परकीय चलन संपादित केले जाणे.
१५. [निरसित].
१६. परकीय चलन इत्यादी स्वीकारण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तींचे कर्तव्य.
१७. [निरसित].
१८. निर्यात केलेल्या मालाबद्दलचे प्रदान.
१८क. भाडेपट्टा भाड्याने देणे किंवा इतर व्यवस्था यांसाठी प्रदान.
१९. प्रतिभूतींची निर्यात व हस्तांतरण यांचे विनियमन.
२० व २१. [निरसित.]
२२. धारक प्रतिभूती काढण्यावरील निर्बंध.
२३. [निरसित.]
२४. व्यवस्था इत्यादींवरील निर्बंध.
२५. भारताबाहेर स्थावर संपत्ती धारण करण्यावर निर्बंध.
२६. ऋण किंवा इतर आबंधने यांच्या संबंधातील हमीबाबत विवक्षित उपबंध.
२७. [निरसित.]
२८. विवक्षित व्यक्तींना व कंपन्यांना भारतात अभिकर्ते, तंत्र किंवा व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करण्यावर निर्बंध.
२९. भारतात कामधंद्याची जागा स्थापित करण्यावरील निर्बंध.
३०. विदेशी राज्यांच्या नागरिकांनी भारतात सेवायोजन इत्यादी स्वीकारण्यास रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी आवश्यक असणे.
३१. भारतात स्थावर संपत्ती संपादन करणे, ती धारण करणे इत्यादींवरील निर्बंध.
३२. [निरसित.]
३३. माहिती मागवण्याची शक्ती.
३४. संशयित व्यक्तींची झडती घेण्याची व दस्तऐवज जप्त करण्याची शक्ती.
३५. अटक करण्याची शक्ती.
३६. वाहने थांबवण्याची व त्यांची झडती घेण्याची शक्ती.
३७. जागांची झडती घेण्याची शक्ती.
३८. दस्तऐवज इत्यादी जप्त करण्याची शक्ती.
३९. अंग झडती घेण्याची शक्ती.
४०. साक्ष देण्यासाठी व दस्तऐवज प्रस्तुत करण्यासाठी व्यक्तींना समन्स पाठवण्याची शक्ती.
४१. दस्तऐवज इत्यादींची अभिरक्षा.

४२. धनादेश, धनाकर्ष इत्यादी वटवणे.
४३. निरीक्षण.
४४. विवक्षित प्रकरणांखेरीज दस्तऐवज किंवा माहिती उघड करण्यास प्रतिषेध.
४५. पोलीस अधिकाऱ्यांची आणि इतर अधिकाऱ्यांची प्रवेश करणे, झडती घेणे, इत्यादींची शक्ती.
४६. पोलीस अधिकाऱ्यांनी जप्त केलेले परकीय चलन किंवा इतर कोणत्याही वस्तू यासंबंधीची कार्यपद्धती.
४७. अधिनियम चुकविणाऱ्या संविदा.
४८. खोटी कथने.
४९. या अधिनियमाखालील परवानगी किंवा लायसने ज्या शर्तींच्या अधीन राहून देण्यात आली असतील, त्या शर्तींचे पालन करण्यातील कसुरी ही अधिनियमाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण असणे.
५०. शास्ती.
५१. अभिनिर्णय करण्याची शक्ती.
५२. अपील मंडळाकडे अपील.
५३. अभिनिर्णेता अधिकाऱ्याच्या व अपील मंडळाच्या साक्षीदारांना समन्स पाठविणे इत्यादी संबंधीच्या शक्ती.
५४. उच्च न्यायालयाकडे अपील.
५५. मृत्यू किंवा नादारीच्या प्रसंगी कार्यवाही चालू राहणे.
५६. अपराध आणि खटले.
५७. अभिनिर्णेता अधिकारी, अपील मंडळ व उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशाच्या व्यतिक्रमणाबद्दल शास्ती.
५८. सक्त वसुली अधिकाऱ्यांनी त्रास देण्याच्या हेतूने झडती इत्यादी घेणे.
५९. गुन्हेगारीच्या मानसिक स्थितीची धारणा.
६०. अभियोगापासून उन्मुक्ती देण्याची शक्ती.
६१. अपराधांची दखल.
६२. विवक्षित गुन्हे बिनदखली असणे.
६३. चलन, प्रतिभूती इत्यादींचे अधिहरण.
६४. सिद्धता, प्रयत्न इत्यादी.
६५. लेखन दोष, इत्यादींची दुरुस्ती.
६६. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६० व अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ लागू होणे.
६७. सीमा शुल्क अधिनियम, १९६२ लागू होणे.
६८. कंपन्यांनी केलेले अपराध.
६९. या अधिनियमाखाली सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या कंपन्यांची नावे, कामधंद्याची ठिकाणे इत्यादी प्रकाशित करण्याची न्यायालयाची शक्ती.
७०. शासनाच्या येणे रकमांची वसुली.
७१. विवक्षित प्रकरणांमध्ये शाबितीचा भार.
७२. विवक्षित प्रकरणांमध्ये दस्तऐवजासंबंधीची गृहीतके.
७३. पूरक उपबंध.
७३क. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा विवरणे सादर करण्यास चुकल्याबद्दल शास्ती.
७४. प्रत्यायोजन.
७५. केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती.
७६. केंद्र शासनाने किंवा रिझर्व्ह बँकेने या अधिनियमान्वये परवानगी किंवा लायसने देताना किंवा मंजूर करताना लक्षात घ्यावयाचे घटक.
७७. विवक्षित अधिकाऱ्यांनी अंमलबजावणी अधिकाऱ्यांना सहाय्य करणे.
७८. वैध कार्यवाहीस आडकाठी.
७९. नियम करण्याची शक्ती.
८०. अडचणी निवारण्याची शक्ती.
८१. निरसन व व्यावृत्ती.

# परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३

(१९७३ चा अधिनियम क्रमांक ४६)

(३१ मे १९९९ रोजी यथाविद्यमान)

[१९ सप्टेंबर १९७३]

देशाच्या परकीय चलनाच्या साधनांचे संरक्षण करण्यासाठी आणि देशाच्या आर्थिक विकासाच्या हितासाठी त्यांचा योग्य उपयोग होण्यासाठी विवक्षित प्रदाने, परकीय चलन व प्रतिभूती यांतील व्यवहार, परकीय चलन [1] * * * व चलन यांच्या आयातीवर व निर्यातीवर अप्रत्यक्षपणे परिणाम करणाऱ्या देवघेवी विनियमित करणारा कायदा एकत्रित आणि विशोधित करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या चोविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास "परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३" असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती व प्रारंभ.

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो भारताच्या, भारताबाहेरील सर्व नागरिकांना आणि भारतात नोंदणी झालेल्या किंवा निगमित कंपन्या किंवा निगम निकाय यांच्या भारताबाहेरील शाखा व अभिकरणे यांना लागू आहे.

(४) केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत नियत करील अशा दिनांकास[2] तो अंमलात येईल :

परंतु असे की, या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि अशा कोणत्याही उपबंधातील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निर्देशाचा अन्वयार्थ तो उपबंध अंमलात येण्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अपील मंडळ" याचा अर्थ, केंद्र शासनाने कलम ५२ च्या पोट कलम (१) अन्वये घटित केलेले परकीय चलन विनियमन अपील मंडळ, असा आहे ; व्याख्या.

(ख) "प्राधिकृत विक्रेता" याचा अर्थ, कलम ६ अन्वये परकीय चलनाचे व्यवहार करण्यास त्यावेळेपुरती प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती, असा आहे;

(ग) "दर्शनी प्रमाणपत्र" याचा अर्थ, प्रतिभूतीवरील हक्काविषयीचे असे प्रमाणपत्र की ज्याच्या (पृष्ठांकनासह किंवा त्याशिवाय) सुपूर्दगीमुळे त्या प्रतिभूतीवरील हक्क हस्तांतरणीय होतो, असा आहे ;

(घ) "प्रतिभूतीवरील हक्काविषयीचे प्रमाणपत्र" याचा अर्थ, ती प्रतिभूती ताब्यात किंवा नियंत्रणात असल्याचा पुरावा म्हणून धंद्याच्या सर्वसाधारण ओघात वापरला जाणारा किंवा एखाद्या पृष्ठांकनाद्वारे किंवा सुपूर्दगीने, त्याद्वारे दर्शित प्रतिभूती हस्तांतरित करण्यास किंवा स्वीकारण्यास त्या दस्तऐवजाच्या कब्जेदाराला प्राधिकृत करणारा किंवा प्राधिकृत करीत असल्याचे अभिप्रेत असलेला, कोणताही दस्तऐवज, असा आहे ;

(ङ) "कुपन" याचा अर्थ, एखाद्या प्रतिभूतीवरील लाभांश किंवा व्याज दर्शविणारे कुपन असा आहे ;

(च) "चलन" यामध्ये, सर्व नाणी, चलनी नोटा, बँक नोटा, डाक नोटा, डाक प्रेष (पोस्टल ऑर्डर), धन प्रेष (मनीऑर्डर), धनादेश, धनाकर्ष, प्रवासी धनादेश, पतपत्रे, हुंड्या आणि वचनपत्रे, यांचा समावेश आहे ;

(छ) "विदेशी चलन" याचा अर्थ, भारतीय चलनाहून भिन्न असे कोणतेही चलन, असा आहे ;

(ज) "परकीय चलन" याचा अर्थ, विदेशी चलन, असा आहे आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो,—

(एक) कोणत्याही विदेशी चलनात देय असलेल्या सर्व ठेवी, जमा व शिल्लक रकमा आणि भारतीय चलनात दर्शवलेले किंवा काढलेले, परंतु कोणत्याही विदेशी चलनात देय असलेले कोणतेही धनाकर्ष, प्रवासी धनाकर्ष, पतपत्रे व हुंड्या ;

(दोन) संलेखाच्या आदेशितीच्या किंवा धारकाच्या किंवा त्यातील अन्य कोणत्याही पक्षकाराच्या विकल्पानुसार भारतीय चलनात किंवा विदेशी चलनात अथवा अंशतः एका व अंशतः अन्य चलनात देय असलेला कोणताही संलेख ;

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे वगळण्यात आले.

२. १ जानेवारी, १९७४ पहा. अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ३०४३, दिनांक २७ ऑक्टोबर, १९९३, पहा. **भारताचे राजपत्र**, भाग दोन, कलम ३ (दोन) इंग्रजी पृष्ठ ३५४०.

(झ्) "विदेशी प्रतिभूती" याचा अर्थ, भारताहून अन्य ठिकाणी निर्मिलेली किंवा काढलेली कोणतीही प्रतिभूती आणि जिचे मुद्दल किंवा ज्यावरील व्याज कोणत्याही विदेशी चलनात किंवा भारताहून अन्य ठिकाणी देय आहे अशी अन्य कोणतीही प्रतिभूती, असा आहे ;

[1]* * * * * *

(ट्) "भारतीय चलन" याचा अर्थ, भारतीय रुपयात दर्शविलेले किंवा काढलेले चलन, असा आहे, परंतु त्यामध्ये भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम २८क अन्वये काढलेल्या विशेष बँक नोटांचा व एक रुपयाच्या विशेष नोटांचा समावेश नाही,

(ठ्) "भारतीय सीमाशुल्क जलक्षेत्र" याचा अर्थ, भारताच्या किनारपट्टीवरील योग्य अशा आधाररेषेपासून मोजलेल्या बारा नाविक मैलापर्यंत समुद्रात विस्तारलेले जलक्षेत्र, असा आहे आणि त्यात कोणताही उपसागर, आखात, बंदर, खाडी किंवा भरती-ओहोटीच्या पाण्यामुळे बनलेली नदी, यांचा समावेश आहे ;

(ड्) "नाणेवटी/सराफी" याचा अर्थ, कलम ७ अन्वये विदेशी चलनासंबंधी कार्यवाही करण्यास त्या काळापुरती प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती, असा आहे ;

(ढ्) "विदेशी बाजारपेठ" याचा अर्थ, कोणत्याही मालाच्या संबंधात भारताबाहेरील देशामधील आणि ज्यामध्ये असा माल विकणे उद्देशित आहे, अशी बाजारपेठ, असा आहे ;

(ण्) कोणत्याही प्रतिभूतीच्या संबंधात "मालक" यामध्ये; जिला ती प्रतिभूती विकण्याची किंवा हस्तांतरित करण्याची शक्ती आहे, अथवा ती प्रतिभूती जिच्या अभिरक्षेत आहे अथवा जी त्यावरील लाभांश किंवा व्याज आपल्या स्वत:च्यावतीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या वतीने स्वीकारते आणि जिचा त्यात कोणताही हितसंबंध आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे, आणि जेथे अशी कोणतीही प्रतिभूती कोणत्याही न्यासामध्ये धारण करण्यात आली असेल अथवा त्यावरील कोणताही लाभांश किंवा व्याज न्यास निधीमध्ये भरण्यात येत असेल तेथे, त्यामध्ये कोणत्याही न्यासाचे कार्य अंमलात आणण्यास अथवा तो न्यास किंवा त्याच्या कोणत्याही अटी अन्य कोणत्याही व्यक्तीच्या संमतीने किंवा संमतीशिवाय प्रत्याहृत करण्यास किंवा त्यात बदल, करण्यास अथवा न्यासाच्या पैशाच्या गुंतवणुकीचे नियंत्रण करण्यास हक्कदार असलेल्या कोणत्याही न्यासीचा किंवा कोणत्याही व्यक्तीचा देखील समावेश होतो ;

(त्) "भारतातील रहिवासी व्यक्ती" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती, असा आहे :—

(एक) भारताचा जो नागरिक, २५ मार्च, १९४७ नंतर कोणत्याही वेळी भारतात राहिलेला आहे, परंतु त्यात जो,—

(क्) भारताबाहेरच्या सेवायोजनासाठी किंवा सेवायोजनानंतर, किंवा

(ख्) भारताबाहेरचा एखादा धंदा किंवा व्यवसाय भारताबाहेर चालवण्यासाठी, किंवा

(ग्) त्याचा भारताबाहेर अनिश्चित काळ राहण्याचा उद्देश ज्यावरून दिसून येईल अशा परिस्थितीत इतर कोणत्याही प्रयोजनासाठी,

यांपैकी कोणत्याही प्रकरणी भारताबाहेर गेला आहे किंवा भारताबाहेर राहत आहे अशा भारतीय नागरिकाचा समावेश नाही ; किंवा

(दोन) उपखंड (एक) च्या परिच्छेद (क्) किंवा परिच्छेद (ख्) किंवा परिच्छेद (ग्) च्या आधारे भारतातील रहिवासी न राहिलेला जो भारतीय नागरिक पुढीलपैकी कोणत्याही प्रकरणी—

(क्) भारतातील सेवायोजनासाठी किंवा सेवायोजनानंतर, किंवा

(ख्) भारतातील एखादा धंदा किंवा व्यवसाय भारतात चालवण्यासाठी, अथवा

(ग्) त्याचा भारतात अनिश्चित काळ राहण्याचा उद्देश ज्यावरून दिसून येईल अशा कोणत्याही परिस्थितीत, अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता,

भारतात परत आलेला किंवा भारतात राहणारा असा भारतीय नागरिक, अथवा

(तीन) जी व्यक्ती भारतातील नागरिक नसूनही पुढीलपैकी कोणत्याही प्रकरणी भारतात आलेली आहे किंवा तेथे राहते, अशी व्यक्ती,—

(क्) भारतातील सेवायोजनाकरता किंवा सेवायोजनानंतर, किंवा

(ख्) भारतात एखादा धंदा किंवा व्यवसाय चालवण्याकरता, किंवा

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम ३ द्वारे वगळण्यात आले.

(ग्) त्याच्या किंवा तिच्या पत्नी किंवा पतीबरोबर राहण्याकरता असा पती किंवा पत्नी भारतातील नागरिक असलेली व्यक्ती असेल, किंवा

(घ्) तिचा भारतात अनिश्चित काळ राहण्याचा उद्देश ज्यावरून दिसून येईल अशा कोणत्याही परिस्थितीत, अन्य कोणत्याही प्रयोजनाकरता,

(चार) २५ मार्च, १९४७ नंतर कोणत्याही वेळी भारताचा जो नागरिक भारतात राहिलेला नसताना, जो, उपखंड (तीन) च्या परिच्छेद (क्), (ख्) व (ग्) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरता किंवा त्या उप खंडाच्या परिच्छेद (घ्) मध्ये निर्देशिलेल्या प्रयोजनाकरता व परिस्थितीत भारतात येतो किंवा भारतात आल्यानंतर अशा कोणत्याही प्रयोजनाकरता व अशा परिस्थितीत भारतात राहतो तो.

**स्पष्टीकरण.**—फक्त उपखंड (तीन) च्या परिच्छेद (क्) किंवा परिच्छेद (ख्) किंवा परिच्छेद (घ्) च्या कारणामुळे जी व्यक्ती भारतातील रहिवासी झालेली आहे ती, ज्या कोणत्याही काळात ती भारताबाहेर असेल, त्या काळात ती भारतातील रहिवासी नसल्याचे मानण्यात येईल;

(थ्) "भारताबाहेरील रहिवासी व्यक्ती" याचा अर्थ, जी भारतातील रहिवासी नाही अशी व्यक्ती, असा आहे;

(द्) "रत्न" यामध्ये मोती, उपरत्न आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकार, **शासकीय** राजपत्रात याबाबत अधिसूचित करील असे अन्य खडे किंवा मणी, यांचा समावेश आहे;

(ध्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(न्) "रिझर्व्ह बँक" याचा अर्थ, "भारतीय रिझर्व्ह बँक", असा आहे;

(प्) " प्रतिभूती " याचा अर्थ, भाग, प्रतिभूती, बंधपत्रे, ऋणपत्रे, ऋणप्रतिभूती, लोक ऋण अधिनियम, १९४४ (१९४४ चा १८) यातील व्याख्येनुसार असलेले शासकीय रोखे, शासकीय बचत प्रमाणपत्रे अधिनियम, १९५९ (१९५९ चा ४६) लागू असलेली बचत प्रमाणपत्रे रोख्यांच्या ठेवी संबंधातील ठेवींच्या पावत्या आणि युनिट ट्रस्टची युनिटे किंवा सब-युनिटे, असा आहे आणि त्यात रोख्यांवरील हक्काविषयीच्या प्रमाणपत्राचा समावेश आहे, पण त्यात शासकीय वचन-पत्राहून अन्य हुंड्या किंवा वचनपत्रे, यांचा समावेश नाही;

[1] * * * * * *

(ब्) कोणत्याही रोख्यांच्या संबंधात हस्तांतरण यात कर्जाच्या किंवा प्रतिभूतीच्या रूपाने हस्तांतरणाचा समावेश आहे.

३. सक्तवसुली अधिकाऱ्यांचे पुढीलप्रमाणे वर्ग असतील, ते असे :— सक्तवसुली अधिकाऱ्यांचे वर्ग.

(क्) सक्तवसुली संचालक,

(ख्) अतिरिक्त सक्तवसुली संचालक,

(ग्) सक्तवसुली उप संचालक,

(घ्) सक्तवसुली सहायक संचालक, आणि

(ङ) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात येतील अशा सक्तवसुली अधिकाऱ्यांचा अन्य वर्ग.

४. (१) केंद्र सरकारला, त्याला योग्य वाटतील अशा व्यक्तींची सक्तवसुली अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल. सक्तवसुली अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांच्या शक्ती.

(२) पोट कलम (१) च्या उपबंधांना बाध न आणता केंद्र शासन, सक्तवसुली संचालकाला किंवा अतिरिक्त सक्तवसुली संचालकाला किंवा सक्तवसुली उपसंचालकाला किंवा सक्तवसुली सहायक संचालकाला, सक्तवसुली सहायक संचालकापेक्षा खालच्या दर्जाचे सक्तवसुली अधिकारी नियुक्त करण्यास प्राधिकृत करू शकेल.

(३) केंद्र सरकार लादील अशा शर्तींच्या आणि मर्यादांच्या अधीनतेने एखाद्या सक्तवसुली अधिकाऱ्याला या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करता येईल आणि त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडता येतील.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम ३ द्वारे वगळण्यात आले.

सक्तवसुली संचालकाची किंवा अन्य सक्तवसुली अधिकाऱ्याची कार्ये सोपवणे. ५. केंद्र सरकार, आदेशाद्वारे आणि त्याला लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, कोणत्याही सीमाशुल्क अधिकाऱ्याला किंवा केंद्रीय उत्पादन शुल्क अधिकाऱ्याला किंवा अन्य पोलीस अधिकाऱ्याला किंवा केंद्र शासनाच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, या अधिनियमाखालील सक्तवसुली संचालकाच्या किंवा अन्य कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्याच्या शक्ती वापरण्यास किंवा कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत करू शकेल.

विदेशी चलनाचे प्राधिकृत विक्रेते. ६. (१) रिझर्व्ह बँक याबाबत तिच्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीस परकीय चलनासंबंधी कार्यवाही करण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) या कलमाखालील प्राधिकारपत्र लेखी असेल आणि त्याद्वारे,—

(एक) सर्व विदेशी चलनासंबंधी कार्यवाही करण्यास प्राधिकृत करता येईल किंवा विनिर्दिष्ट विदेशी चलनासंबंधी कार्यवाही करण्यापुरते प्राधिकृत करणे निर्बंधित करता येईल;

(दोन) विदेशी चलनासंबंधातील सर्व प्रकारच्या कार्यवाही करण्यास प्राधिकृत करता येईल किंवा विनिर्दिष्ट व्यवहारापुरती कार्यवाही करण्यापुरते प्राधिकृत करणे निर्बंधित करता येईल;

(तीन) विनिर्दिष्ट काळापुरते किंवा विनिर्दिष्ट रकमांपुरते परिणामक म्हणून मंजूर करता येईल;

(चार) त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने मंजूर करता येईल;

(३) पोटकलम (१) अन्वये मंजूर केलेले कोणतेही प्राधिकारपत्र जर रिझर्व्ह बँकेची पुढील गोष्टींबाबत खात्री पटली तर तिला कोणत्याही वेळी प्रत्याहृत करता येईल—

(एक) तसे करणे लोकहिताचे आहे, किंवा

(दोन) ज्या शर्तींच्या अधीनतेने प्राधिकारपत्र देण्यात आले होते त्या शर्तींचे प्राधिकृत विक्रेत्याने पालन केलेले नाही किंवा त्याने या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे, अधिसूचनेचे, निदेशाचे किंवा आदेशाचे व्यतिक्रमण केलेले आहे:

परंतु असे की, त्या प्राधिकृत विक्रेत्याला याबाबतीत प्रतिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणास्तव असे कोणतेही प्राधिकारपत्र प्रत्याहृत केले जाणार नाही.

(४) प्राधिकृत विक्रेता विदेशी चलनासंबंधीच्या आपल्या सर्व कार्यवाहीमध्ये आणि कलम ७४ अन्वये त्याला प्रत्यायोजित करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करताना व कार्ये पार पाडताना रिझर्व्ह बँकेला वेळोवेळी जे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश किंवा सूचना देणे योग्य वाटेल त्या निदेशांचे किंवा सूचनांचे पालन करील आणि रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतीखेरीज आपल्या, या कलमाखालील प्राधिकारपत्राच्या अटींशी विसंगत अशा कोणत्याही व्यवहारात स्वतःला गुंतवणार नाही.

(५) कोणत्याही व्यक्तीच्यावतीने परकीय चलनासंबंधीची कोणतीही कार्यवाही हाती घेण्यापूर्वी, प्राधिकृत विक्रेता, त्या व्यक्तीला अशी घोषणा करण्यास आणि अशी माहिती देण्यास फर्मावील की, त्यायोगे त्याची याबाबत वाजवीरीत्या खात्री पटेल की, त्या व्यवहारात या अधिनियमाच्या उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे, अधिसूचनेचे, निदेशाचे किंवा आदेशाचे कोणतेही व्यतिक्रमण किंवा टाळाटाळ अंतर्भूत नाही किंवा कोणत्याही व्यतिक्रमणाच्या किंवा टाळाटाळीच्या प्रयोजनार्थ त्याचे संकल्पन झालेले नाही आणि ज्यावेळी उक्त व्यक्ती अशी कोणतीही आवश्यकता पूर्ण करण्याचे नाकारील किंवा ती केवळ असमाधानकारक रीत्या पूर्ण करील त्यावेळी प्राधिकृत विक्रेता ती कार्यवाही करण्याचे नाकारील आणि पूर्वोक्त प्रमाणे कोणतेही व्यतिक्रमण किंवा टाळाटाळ करण्याचे त्या व्यक्तीने योजलेले आहे असे वाटण्याचे त्याला कारण असेल तर तो ती बाब रिझर्व्ह बँकेला कळवील.

नाणेवटी. ७. (१) रिझर्व्ह बँक याबाबत तिच्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीला विदेशी चलनासंबंधी कार्यवाही करण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) या कलमाखालील प्राधिकारपत्र लेखी असेल आणि त्याद्वारे,—

(एक) सर्व विदेशी चलनासंबंधी कार्यवाही करण्यास प्राधिकृत करता येईल किंवा विनिर्दिष्ट विदेशी चलनासंबंधी कार्यवाही करण्यापुरते प्राधिकृत करणे निर्बंधित करता येईल;

(दोन) विदेशी चलनासंबंधातील सर्व प्रकारच्या कार्यवाही करण्यास प्राधिकृत करता येईल किंवा फक्त विनिर्दिष्ट व्यवहारासंबंधात कार्यवाही करण्यापुरते प्राधिकृत करणे निर्बंधित करता येईल;

(तीन) एका विशिष्ट ठिकाणाबाबतच प्राधिकारपत्र देता येईल आणि नाणेवटीस आपला धंदा फक्त त्याठिकाणीच करता येईल;

(चार) विनिर्दिष्ट काळापुरते किंवा विनिर्दिष्ट रकमांपुरते परिणामक व्हावे म्हणून मंजूर करता येईल;

(पाच) त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने मंजूर करता येईल;

(३) पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेले कोणतेही प्राधिकारपत्र, रिझर्व्ह बँकेची जर पुढील बाबतीत खात्री पटली असेल की,—

(एक) तसे करणे लोकहिताचे आहे ; किंवा

(दोन) ज्या शर्तींच्या अधीनतेने प्राधिकारपत्र देण्यात आले होते त्या शर्तींचे नाणेवटीने पालन केलेले नाही किंवा त्याने या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे, अधिसूचनेचे, निदेशाचे किंवा आदेशाचे व्यतिक्रमण केलेले आहे,

तर रिझर्व्ह बँकेला ते कोणत्याही वेळी प्रत्याहृत करता येईल :

परंतु असे की, नाणेवटीला याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरून असे कोणतेही प्राधिकारपत्र प्रत्याहृत केले जाणार नाही.

(४) कलम ६ ची पोटकलमे (४) व (५) यांचे उपबंध ते जेथवर लागू करण्याजोगे असतील तेथवर प्राधिकृत विक्रेत्याच्या संबंधात जसे लागू होतात तसेच नाणेवटीच्या बाबतीतही लागू होतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील विदेशी चलन याचा अर्थ नोटा, नाणी किंवा प्रवासी धनादेश यांच्या स्वरूपातील विदेशी चलन आणि कार्यवाही याचा अर्थ नोटा, नाणी किंवा प्रवासी धनादेश याच्या स्वरूपातील विदेशी चलन खरेदी करणे अथवा नोटा किंवा नाणी यांच्या स्वरूपातील विदेशी चलन विकणे असा आहे.

परकीय चलनासंबंधीच्या कार्यवाहीवरील निर्बंध.

८. (१) रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष पूर्वानुमतीखेरीज, प्राधिकृत विक्रेत्याहून अन्य कोणतीही व्यक्ती भारतात, आणि प्राधिकृत विक्रेत्याहून अन्य कोणतीही भारतातील रहिवासी व्यक्ती भारताबाहेर, प्राधिकृत विक्रेता नसलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून, कोणतेही परकीय चलन खरेदी किंवा अन्यथा संपादित करणार नाही किंवा उसनवार घेणार नाही, अथवा तिला विकणार नाही किंवा अन्यथा हस्तांतरित करणार नाही किंवा उसनवार देणार नाही किंवा तिच्याशी विनिमय करणार नाही :

परंतु असे की, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम कोणतीही व्यक्ती व नाणेवटी यांच्यामध्ये भारतात घडलेल्या विदेशी चलनाच्या कोणत्याही खरेदीवर किंवा विक्रीवर होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोट कलमाच्या प्रयोजनार्थ, जी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडे परकीय चलन ठेव म्हणून ठेवते किंवा अशा अन्य व्यक्तीकडे परकीय चलनाचे खाते उघडते ती, अशा अन्य व्यक्तीला परकीय चलन उसने देते असे मानण्यात येईल.

(२) रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष पूर्वानुमतीखेरीज कोणतीही व्यक्ती मग ती प्राधिकृत विक्रेता असो वा नाणेवटी असो वा अन्यथा असो—ज्यामध्ये, रिझर्व्ह बँकेने त्या वेळेपुरत्या प्राधिकृत केलेल्या दरांहून अन्य विनिमय दराने भारतीय चलनाचे विदेशी चलनात अन्यथा विदेशी चलनाचे भारतीय चलनात रूपांतर करण्याची सोय आहे, अशा कोणत्याही व्यवहारात भाग घेणार नाही.

(३) एखाद्या प्राधिकृत विक्रेत्याहून किंवा नाणेवटीहून अन्य कोणत्याही व्यक्तीने ज्यावेळी कोणत्याही विवक्षित प्रयोजनार्थ, कोणतेही परकीय चलन संपादित केले असेल त्यावेळी किंवा ज्यावेळी कोणत्याही व्यक्तीला परकीय चलन संपादित करण्यास सशर्त परवानगी देण्यात आली असेल त्यावेळी उक्त व्यक्ती अशा प्रकारे संपादित केलेले ते परकीय चलन त्या प्रयोजनाहून अन्य प्रयोजनाकरता वापरणार नाही किंवा, प्रकरणपरत्वे, तिला देण्यात आलेली परवानगी ज्या शर्तींच्या अधीन आहे अशा कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर करणार नाही, आणि ज्यावेळी अशा प्रकारे संपादित परकीय चलन अशा रीतीने वापरण्यात येणार नसेल किंवा शर्तीचे पालन करता येणे शक्य नसेल त्यावेळी उक्त व्यक्तीला, असे परकीय चलन अशा रीतीने वापरता येणार नाही किंवा शर्तीचे पालन करता येणार नाही हे तिला कळवल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या अवधीत ते परकीय चलन एखाद्या प्राधिकृत विक्रेत्याला किंवा नाणेवटीला विकील.

(४) शंकास्पदता टाळण्यासाठी याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, ज्यावेळी एखादी व्यक्ती भारतात कोणताही माल पाठवण्यासाठी किंवा आणण्यासाठी परकीय चलन संपादित करील, परंतु असा कोणताही माल एका वाजवी वेळेच्या आत पाठवणार किंवा आणणार नाही अथवा संपादित केलेल्या परकीय चलनाएवढ्या मूल्याचा माल पाठवणार किंवा आणणार नाही अथवा परकीय चलन संपादित करतेवेळी त्याने विनिर्दिष्ट केलेला मालाचा प्रकार, प्रत किंवा परिमाण यांहून भिन्न प्रकारचा, भिन्न प्रतीचा किंवा भिन्न परिमाणातील कोणताही माल पाठवील किंवा आणील त्यावेळी तद्‌विरूद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर, अशा व्यक्तीने, ज्या प्रयोजनार्थ परकीय चलन संपादित केले त्या प्रयोजनार्थ ती ते वापरू शकली नाही असे किंवा, प्रकरणपरत्वे, अशा रीतीने संपादित केलेले परकीय चलन, ते ज्या प्रयोजनासाठी संपादित केले होते त्याहून अन्य प्रयोजनासाठी तिने त्याचा वापर केला, असे गृहीत धरण्यात येईल.

(५) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांनुसार कोणत्याही डाक कार्यालयातून डाकप्रेषांच्या किंवा धन प्रेषांच्या स्वरूपात कोणतेही परकीय चलन विकत घेण्यास एखाद्या व्यक्तीला प्रतिबंध केला जातो असे या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे मानण्यात येणार नाही.

प्रदानांवरील निर्बंध. ९. (१) रिझर्व्ह बँकेकडून या पोटकलमाच्या उपबंधापासून सशर्त किंवा बिनशर्त सूट दिली जाऊ शकेल अशा कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष सुटीमध्ये व त्या सुटीनुसार उपबंधित केले असेल त्याखेरीज, भारतातील कोणत्याही व्यक्तीला किंवा रहिवाशाला पुढील गोष्टी करता येणार नाहीत,—

(क) भारताबाहेरील कोणत्याही रहिवासी व्यक्तीला किंवा त्या व्यक्तीच्या जमाखाती कोणतेही प्रदान करणे ;

(ख) प्राधिकृत विक्रेत्यामार्फत नव्हे तर, अन्यथा कोणाहीकडून भारताबाहेरील कोणत्याही रहिवासी व्यक्तीच्या आदेशाने किंवा तिच्या वतीने, कोणतेही प्रदान स्वीकारणे.

स्पष्टीकरण.—या खंडाच्या प्रयोजनासाठी ज्यावेळी भारतातील कोणतीही व्यक्ती, किंवा रहिवासी कोणत्याही भारताबाहेरील रहिवासी व्यक्तीच्या आदेशाने किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत (प्राधिकृत विक्रेता धरून), भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून तत्सम आवक वित्तप्रेषण झाल्याशिवाय कोणतेही प्रदान स्वीकारील, त्यावेळी अशा व्यक्तीने प्राधिकृत विक्रेत्यामार्फत नव्हे तर अन्यथा असे प्रदान स्वीकारले असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) कोणतेही विपत्र किंवा वचनपत्र लिहिणे, काढणे किंवा परक्रांत करणे अथवा स्वीकारणे व त्यामुळे प्रदान स्वीकारण्याचा अधिकार (मग तो प्रत्यक्ष असो वा समाश्रित असो) भारताबाहेर राहत असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाजूने निर्माण किंवा हस्तांतरित करणे ;

(घ) भारताबाहेरील कोणत्याही रहिवासी व्यक्तीच्या आदेशाने किंवा तिच्यावतीने कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या जमाखाती प्रदान करणे ;

(ङ) भारताबाहेरील कोणत्याही रहिवासी व्यक्तीच्या जमाखाती कोणतीही रक्कम ठेवणे;

(च) कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या जमाखाती कोणतेही प्रदान करणे अथवा कोणत्याही व्यक्तीकरता किंवा तिच्या आदेशाने किंवा तिच्या वतीने पुढील गोष्टींचा मोबदला म्हणून किंवा त्यांच्या समवेत म्हणून कोणतेही प्रदान स्वीकारणे,—

(एक) कोणत्याही व्यक्तीकडून एखाद्या प्रदानाचा स्वीकार किंवा कोणत्याही व्यक्तीकडून भारताबाहेरील संपत्तीचे संपादन ;

(दोन) कोणत्याही व्यक्तीच्या बाजूने भारताबाहेरील प्रदान स्वीकारण्याचा किंवा संपत्ती संपादित करण्याचा अधिकार (मग तो प्रत्यक्ष असो किंवा समाश्रित असो) निर्माण किंवा हस्तांतरित करणे ;

(छ) कोणतेही विपत्र किंवा वचनपत्र लिहिणे, काढणे, किंवा परक्रांत करणे, कोणतीही प्रतिभूती हस्तांतरित करणे, किंवा कोणत्याही ऋणाचा स्वीकार करणे व त्यामुळे खंड (च) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही बाबीचा मोबदला म्हणून किंवा तिच्या समवेत प्रदान स्वीकारण्याचा अधिकार (मग तो प्रत्यक्ष असो किंवा समाश्रित असो) कोणत्याही व्यक्तीच्या प्रीत्यर्थ निर्माण किंवा हस्तांतरित केला जाणे ;

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट पुढील गोष्टींना बेकायदेशीर ठरवणार नाही—

(क) प्राधिकृत विक्रेत्याकडून किंवा नाणेबदलीकडून कलम ८ अन्वये मिळवलेल्या परकीय चलनाने अथवा रिझर्व्ह बँकेने दिलेल्या प्राधिकारपत्रानुसार एखाद्या व्यक्तीने ठेवून घेतलेल्या परकीय चलनाने, आधीच प्राधिकृत केलेले कोणतेही प्रदान करणे ;

(ख) वेतन म्हणून मिळालेल्या विदेश चलनाने कोणतेही प्रदान करणे किंवा भारतातील कोणत्याही धंद्यातून किंवा भारतात असताना केलेल्या कोणत्याही गोष्टीतून उद्‌भवलेल्या नसतील अशा सेवांबद्दल प्रदान करणे.

(३) या पोटकलमात करण्यात येतील त्या तरतुदीनुसार किंवा रिझर्व्ह बँकेकडून सशर्त किंवा बिनशर्तपणे, या पोटकलमाच्या उपबंधापासून देण्यात येईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष सुटीनुसार असेल त्याखेरीज, कोणतीही व्यक्ती, भारतात फक्त एखाद्या प्राधिकृत विक्रेत्यामार्फतच जे स्वीकारण्यात येईल असे वित्तप्रेषण वगळता एरव्ही, कोणत्याही विदेशी राष्ट्रातून भारतात कोणत्याही रकमेचे प्रेषण करणार नाही किंवा करवण्याची व्यवस्था करणार नाही.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने काहीही करण्यावर निर्बंध घातला जाणार नाही.

(५) या कलमाच्या आणि कलम १९ च्या प्रयोजनासाठी "प्रतिभूती" यामध्ये, लाभांश किंवा व्याज दर्शवणारी कुपने किंवा अधिपत्रे आणि आयुर्विमापत्रे किंवा सावधि-विमापत्रे यांचा समावेश आहे.

अवरुद्ध लेखा. १०. (१) ज्यावेळी रिझर्व्ह बँकेने भारताबाहेरील कोणत्याही रहिवासी व्यक्तीला कोणत्याही रकमेच्या प्रदानासंबंधात कलम ९ च्या उपबंधातून सूट दिलेली असेल आणि प्रदान अवरुद्ध करण्यात येईल या शर्तीच्या अधीनतेने ती सूट देण्यात आली असेल त्यावेळी—

(क) रिझर्व्ह बँक सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये निदेशित करील अशा रीतीने ते प्रदान त्या व्यक्तीच्या नावाने असलेल्या एखाद्या अवरुद्ध लेख्यात केले जाईल ;

(ख) त्या खाती ती रक्कम जमा केली जाणे ही, प्रदान करणाऱ्या व्यक्तीस जमा केलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत, सुयोग्य विमुक्ती असेल.

(२) अवरुद्ध लेख्याच्या जमाखाती असलेली कोणतीही रक्कम, रिझर्व्ह बँकेकडून सशर्त किंवा अन्यथा देण्यात येईल अशा कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीनुसार असेल त्याखेरीज काढण्यात येणार नाही.

(३) या कलमातील "अवरुद्ध लेखा" याचा अर्थ, रिझर्व्ह बँकेकडून याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या एखाद्या बँकेच्या भारतातील कोणत्याही कार्यालयात किंवा शाखेत, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर "अवरुद्ध लेखा" म्हणून उघडलेला लेखा किंवा अशा प्रारंभापूर्वी किंवा नंतर रिझर्व्ह बँकेच्या आदेशाने अवरुद्ध करण्यात आलेला लेखा, असा आहे.

११. (अनिवासींनी धारण केलेल्या सत्तासंबंधीचे निर्बंध) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम ४ द्वारे निरसित.

१२. (विशेष लेखे) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम ४ द्वारे निरसित.

विवक्षित चलनाच्या व सोन्या-चांदीच्या आयातीवरील व निर्यातीवरील निर्बंध.

१३. (१) केंद्र सरकारला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा आदेश देता येईल की, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कोणतीही सूट असल्यास तिच्या अधीनतेने कोणत्याही व्यक्तीला रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने व कोणतीही विहित फी असल्यास ती भरल्यानंतर असेल त्याखेरीज, [१] * * * कोणतेही परकीय चलन किंवा कोणतेही भारतीय चलन भारतात आणता किंवा पाठवता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—पूर्वोक्त अशी कोणतीही वस्तू भारतातील कोणत्याही बंदरात किंवा ठिकाणी आणण्यास किंवा पाठवण्यास—मग ती ज्या जहाजामधून किंवा वाहनामधून नेली जात असेल त्या जहाजामधून किंवा वाहनातून बाहेर न काढता भारताबाहेर नेण्याचा उद्देश असला तरीसुद्धा—या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी ती वस्तू भारतात आणली किंवा, प्रकरणपरत्वे, पाठवली असल्याचे मानण्यात येईल.

(२) कोणतीही व्यक्ती, रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने असेल अथवा रिझर्व्ह बँकेकडून याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीच्या लेखी परवानगीने असेल त्याखेरीज, कोणतेही [२] * * * * भारतीय चलन किंवा तिने एखाद्या प्राधिकृत विक्रेत्याकडून वा नाणेवटीकडून मिळवलेल्या परकीय चलनाहून अन्य असे परकीय चलन, भारताबाहेर नेणार किंवा पाठवणार नाही.

केंद्र शासनाकडून परकीय चलन संपादित केले जाणे.

१४. केंद्र सरकारला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे भारतातील पुढील प्रकारच्या प्रत्येक व्यक्तीस किंवा रहिवाशास,

(क) त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असे परकीय चलन जिच्या मालकीचे आहे किंवा जी धारण करते अशा व्यक्तीला ते, रिझर्व्ह बँकेला किंवा त्या प्रयोजनासाठी रिझर्व्ह बँक प्राधिकृत करील अशा व्यक्तीला केंद्र सरकार निश्चित करील अशा रिझर्व्ह बँकेने त्या काळापुरत्या प्राधिकृत केलेल्या विनिमय दराने परिगणित केलेल्या किंमतीहून कमी नसेल अशा किंमतीस केंद्र सरकारच्यावतीने विक्रीसाठी देऊ करण्याचा किंवा देऊ करवण्याची व्यवस्था करण्याचा,

(ख) त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असे परकीय चलन स्वीकारण्याचा कोणताही अधिकार अभिहस्तांकित करण्यास हक्कदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला केंद्र सरकारच्या वतीने असा हक्क, ज्यामध्ये असे परकीय चलन व्यक्त करण्यात आलेले आहे त्या विदेशी चलनाचे भारतीय चलनात रुपांतर करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने कलम ८ च्या पोट कलम (२) अनुसार त्या काळापुरता प्राधिकृत केलेला दर लक्षात घेऊन केंद्र सरकार निश्चित करील एवढा मोबदला घेऊन, रिझर्व्ह बँकेला हस्तांतरित करण्याचा,

आदेश देता येईल :—

परंतु असे की, केंद्र सरकार, उक्त अधिसूचनेद्वारे किंवा एखाद्या वेगळ्या आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला उक्त अधिसूचनेत दिलेल्या आदेशाच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, या कलमातील कोणतीही गोष्ट एखाद्या व्यक्तीने एखाद्या प्राधिकृत विक्रेत्याकडून किंवा नाणेवटीकडून संपादित केलेल्या आणि रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने कोणत्याही प्रयोजनाकरता ठेवून घेतलेल्या कोणत्याही परकीय चलनास लागू होणार नाही.

१५. (विवक्षित प्रकरणी विदेशी चलनात प्रदान करण्याचा निदेश देण्याची केंद्र सरकारची शक्ती.) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम ६ द्वारे निरसित.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम ५ (क) द्वारे वगळण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख) द्वारे वगळण्यात आले.

**परकीय चलन इ. स्वीकारण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीचे कर्तव्य.** १६. (१) कोणतेही परकीय चलन स्वीकारण्यास किंवा भारताबाहेरील रहिवासी व्यक्तीकडून रुपयांमध्ये प्रदान स्वीकारण्यास हक्कदार असलेली कोणतीही व्यक्ती, रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने असेल त्याखेरीज, जिच्या परिणामी पुढील गोष्टी सुनिश्चित केल्या जातील अशी कोणतीही गोष्ट करणार नाही किंवा ती करण्यापासून परावृत्त राहणार नाही किंवा कोणतीही कृती करणार नाही किंवा ती करण्यापासून परावृत्त राहणार नाही—

(क) ते संपूर्ण परकीय चलन किंवा त्याचा भाग त्याच्याकडून स्वीकारला जाण्यास किंवा प्रदानात विलंब होणे ; अथवा

(ख) ते संपूर्ण परकीय चलन किंवा त्याचा भाग किंवा प्रदान त्याच्याकडून स्वीकार्य असण्याचे बंद होणे.

(२) कोणत्याही परकीय चलनाच्या किंवा रुपयातील प्रदानाच्या संबंधात पोट कलम (१) च्या आवश्यकता पूर्ण करण्यात ज्यावेळी एखादी व्यक्ती कसूर करील त्या परकीय चलनाची किंवा प्रदानाची स्वीकृती सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ समयोचित वाटतील असे निदेश रिझर्व्ह बँक त्या व्यक्तीला देऊ शकेल.

१७. (आयात केलेले सोने किंवा चांदी इत्यादींच्या उपयोगाचे विनियमन करण्याची शक्ती.) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम ६ द्वारे निरसित.

**निर्यात केलेल्या मालाबद्दलचें प्रदान.** १८. (१) (क) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला सर्व किंवा कोणताही माल किंवा मालाचा कोणताही वर्ग (यात यापुढे निर्यात म्हणून उल्लेख करण्यात आलेला) अशा प्रकारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही ठिकाणी भूमार्गाने, जलमार्गाने किंवा वायुमार्गाने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे नेण्यास किंवा पाठवण्यास मनाई करू शकेल, माल निर्यातदाराने विहित करण्यात येईल अशा किंवा अशा प्रकारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आणि सर्व महत्त्वाचा तपशील खरा असलेल्या पुराव्याच्या आधारासह विहित नमुन्यातील घोषणापत्र ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबर :—

(एक) मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य ; किंवा

(दोन) निर्यातीच्यावेळी मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य निश्चित करता येण्यासारखे नसेल तर, बाजारपेठेतील विद्यमान स्थिती लक्षात घेता विदेशी बाजारपेठेत मालाची विक्री झाल्यानंतर जे मूल्य मिळण्याची निर्यातदाराला अपेक्षा आहे ते मूल्य यांचा समावेश असेल—विहित प्राधिकाऱ्याला दिले असेल.

आणि उक्त घोषणापत्रात या गोष्टी दृढ केल्या असतील की, त्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य (मग ते निर्यातीच्या वेळी निश्चित करण्याजोगे असो वा नसो) विहित रीतीने प्रदान केलेले आहे किंवा विहित कालावधीच्या आत विहित रीतीने प्रदान केले जाईल, तर ती गोष्ट अलाहिदा.

(ख) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे केंद्र सरकारचे मत असेल तर, त्याला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, खंड (क) खालील अधिसूचना लागू असलेल्या मालांपैकी कोणताही माल विनिर्दिष्ट करता येईल, आणि निदेश देता येईल की, अशा प्रकारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मालाच्या बाबतीत, ज्यावेळी एखादा निर्यातदार खंड (क) च्या उपखंड (दोन) अन्वये बाजारपेठेतील विद्यमान स्थिती लक्षात घेऊन विदेशी बाजारपेठेत अशा मालाच्या विक्रीनंतर जे मूल्य मिळण्याची अपेक्षा असेल त्या मूल्याचे घोषणापत्र करील त्यावेळी, याबाबत निर्यातदाराने रिझर्व्ह बँकेकडे अर्ज केल्यानंतर रिझर्व्ह बँकेने दिलेल्या परवानगीने असेल त्याखेरीज, तो, घोषित केलेल्या मूल्याहून कमी मूल्यास अशा मालाची विक्री करण्यास प्राधिकृत करणार नाही किंवा मुभा देणार नाही किंवा कोणत्याही रीतीने अशा विक्रीतील एक पक्षकार होणार नाही :

परंतु असे की, याबाबतीत निर्यातदाराला अभिवेदन करण्याची वाजवी संधी असल्याखेरीज रिझर्व्ह बँकेकडून या खंडाखाली कोणतीही परवानगी नाकारली जाणार नाही :

परंतु आणखी असे की, ज्यावेळी निर्यातदार या खंडाखाली परवानगीसाठी रिझर्व्ह बँकेकडे अर्ज करील आणि अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून वीस दिवसांच्या आत रिझर्व्ह बँक, निर्यातदाराला असे कळवणार नाही की, ज्यासाठी अर्ज करण्यात आला होता ती परवानगी नाकारण्यात आली आहे त्यावेळी, रिझर्व्ह बँकेने अशी परवानगी दिलेली आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—दुसऱ्या परंतुकाच्या प्रयोजनासाठी वीस दिवसांच्या कालावधीची गणना करताना, पहिल्या परंतुकान्वये निर्यातदाराला अभिवेदन करण्याची संधी देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने कोणताही कालावधी घेतला असेल तर, तो वगळण्यात येईल.

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) खालील अधिसूचना लागू होत असलेल्या कोणत्याही मालाची निर्यात करण्यात आली असेल अशा बाबतीत कोणतीही व्यक्ती, रिझर्व्ह बँकेची परवानगी घेतलेली असेल त्याखेरीज एरव्ही, जिच्यामुळे पुढीलप्रमाणे गोष्टी घडतील अशी कोणतीही गोष्ट करणार नाही, किंवा ती करण्यापासून परावृत्त राहणार नाही, किंवा कोणतीही कृती करणार नाही किंवा ती करण्यापासून परावृत्त राहणार नाही—

(क)पोट-कलम (१) च्या खंड (क्) च्या उपखंड (एक) किंवा उपखंड (दोन) खाली मोडणाऱ्या एखाद्या प्रकरणात,—

(क्) मालाबद्दलचे प्रदान—

(एक) विहित केलेल्या रीतीपेक्षा अन्य रीतीने करण्यात येणे, किंवा

(दोन) त्यास पोट-कलम (१) च्या खंड (१) च्या खंड (क) अन्वये विहित केलेल्या कालावधी पेक्षा अधिक विलंब लावला जाणे ; किंवा

(ख्) निर्यात केलेल्या मालाच्या विक्रीचे उत्पन्न रिझर्व्ह बँकेकडून मुभा दिली जाईल अशा कोणत्याही वजातीच्या अधील असलेल्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य न दर्शविणे, आणि

(ख) पोटकलम (१) च्या खंड (क) च्या उपखंड (दोन) खाली मोडणाऱ्या एखाद्या प्रकरणात मालाच्या विक्रीला, व्यापाराचा सर्वसामान्य ओघ लक्षात घेता, गैरवाजवी ठरेल एवढ्या मर्यादेपर्यंत विलंब लावणे :

परंतु, या पोट-कलमाच्या उपबंधांच्या कोणत्याही व्यतिक्रमणाच्या बाबतीत विहित कालावधी समाप्त झाला नसल्यास, आणि मालाच्या संपूर्ण निर्यात मूल्याएवढ्या रकमेचे प्रदान विहित कालावधीत विहित पद्धतीने करण्यात आले नसल्यास, कोणतीही कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

(३) ज्यावेळी पोट-कलम (१) च्या खंड (क्) खालील अधिसूचना लागू असलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात विहित कालावधी समाप्त झाला असेल आणि त्यासाठीचे प्रदान पूर्वोक्तप्रमाणे करण्यात आलेले नसेल, त्यावेळी जिने विक्री केली आहे किंवा जिला मालाची विक्री करण्याचा किंवा त्याची विक्री करविण्याचा हक्क आहे अशा व्यक्तीने तद्‌विरुद्ध सिद्ध केले नाही तर, अशा व्यक्तीने उप-रोक्तप्रमाणे मालाबद्दल प्रदान स्वीकारण्यासाठी किंवा वसूल करण्यासाठी सर्व वाजवी उपाय योजलेले नाहीत, असे गृहीत धरण्यात येईल आणि तद्‌नुसार तिने पोट-कलम (२) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण केले आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

(४) ज्यावेळी पोटकलम (१) च्या खंड (क्) खालील अधिसूचना लागू असलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात विहित कालावधी संपलेला असेल आणि त्याबद्दलचे प्रदान उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेले नसेल, त्यावेळी जिने मालाची विक्री केली आहे किंवा जिला मालाची विक्री करण्याचा किंवा त्याची विक्री करविण्याचा हक्क आहे अशा व्यक्तीला, याबाबतीत रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा कालावधीच्या आत पुढील गोष्टी सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी रिझर्व्ह बँकेला समयोचित वाटतील असे निदेश देता येतील—

(एक) जर मालाची विक्री करण्यात आली असेल तर त्याचे प्रदान, किंवा

(दोन) जर मालाची विक्री करण्यात आली नसेल, तर, परिस्थितीनुसार शक्य असेल त्याप्रमाणे उपरोक्तप्रमाणे मालाची विक्री व त्याबद्दलचे प्रदान किंवा मालाची भारतामध्ये पुन्हा आयात, आणि पूर्ववर्ती उपबंधाच्या सर्वसाधारणतेला बाधा न आणता माल, त्याबद्दलचे प्रदान घेण्याचा अधिकार किंवा असे प्रदान करवण्याचा अन्य कोणताही अधिकार, केंद्र सरकारकडे किंवा त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्याचे किंवा अभिहस्तांकित करण्याचे निदेश रिझर्व्ह बँक देऊ शकेल.

(५) ज्यावेळी कोणताही माल किंवा प्रदान स्वीकारण्याचा अधिकार किंवा असे प्रदान करवण्याचा अन्य कोणताही अधिकार पोटकलम (४) अनुसार हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करण्यात आला असेल त्यावेळी, केंद्र सरकार, मालाच्या संबंधात केंद्र सरकारने वसूल केलेल्या किंवा त्याच्या वतीने वसूल करण्यात आलेल्या रकमेतून, मालाची विक्री करण्यात किंवा अशा मालाच्या संबंधात रक्कम वसूल करण्यात किंवा संपादित करण्यात केंद्र सरकारने केलेला सर्व खर्च, आकार आणि व्यय वजा केल्यानंतर ती रक्कम, ती हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करणाऱ्या व्यक्तीला चुकती करील.

(६) पोट-कलम (१) च्या उपबंधांना बाध न आणता, ज्यावेळी त्या पोट-कलमान्वये दिलेल्या घोषणापत्रात विनिर्दिष्ट केलेले मालाचे मूल्य हे, त्या पोट-कलमाच्या खंड (क्) च्या उप खंड (एक) खाली येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत, त्या मालाच्या संपूर्ण निर्यात मूल्याच्या रकमेपेक्षा, किंवा त्या खंडाच्या उप खंड (दोन) खाली येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत बाजारपेठेतील विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन, त्या मालाची विदेशी बाजारपेठेत विक्री केल्यावर जे मूल्य मिळण्याची अपेक्षा निर्यातदार करू शकत असेल त्या मूल्याच्या रकमेपेक्षा कमी आहे असे रिझर्व्ह बँकेचे मत असेल तर, रिझर्व्ह बँकेच्या मते अशा मालाच्या निर्यात मूल्याच्या रकमेचे किंवा बाजारपेठेतील विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन अशा मालाची विदेशी बाजारपेठेमध्ये विक्री केल्यानंतर जी रक्कम मिळण्याची अपेक्षा निर्यातदारास करता येत असेल त्या रकमेचे प्रदान निर्यातदाराच्या वतीने रिझर्व्ह बँकेने किंवा रिझर्व्ह बँकेने प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीने, विहित रीतीने स्वीकारण्याची व्यवस्था, त्या मालाच्या निर्यातदाराकडून करण्यात येईल अशा वेळेपर्यंत नौवहन दस्तऐवज धारण करणाऱ्या व्यक्तीला ते दस्तऐवज आपल्याच ताब्यात अडवून ठेवण्यास फर्मावणारा आदेश रिझर्व्ह बँक देऊ शकेल.

(७) या कलमाचे उपबंध आणि त्याखाली देण्यात आलेला कोणताही आदेश किंवा निदेश यांचे अनुपालन होण्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, रिझर्व्ह बँक किंवा पोट-कलम (१) मध्ये

निर्दिष्ट केलेला कोणताही विहित प्राधिकारी, मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य किंवा, प्रकरणपरत्वे, बाजारपेठेतील विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन, विदेशी बाजारपेठेत मालाची विक्री केल्यानंतर निर्यातदारास ज्या मूल्याची अपेक्षा असेल ते मूल्य विहित रीतीने चुकते करण्यात आले आहे, किंवा विहित कालावधीच्या आत चुकते करण्यात येईल, हे दर्शवण्यासाठी त्या पोट-कलमाच्या खंड (क) खालील अधिसूचना लागू होणाऱ्या मालाची निर्यात करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला विदेशी खरेदीदाराबरोबर झालेल्या संविदा किंवा इतर पुरावे दाखविण्यास फर्मावू शकेल.

(८) पोट-कलम (१) च्या उपबंधांना बाध न आणता, ज्यावेळी रिझर्व्ह बँकेने कोणत्याही प्राधिकृत विक्रेत्याला, त्याच्या (पोट-कलम (१) अनुसारच्या घोषणापत्रावर जिने स्वाक्षरी केलेली आहे अशी, व्यक्ती नसलेल्या) नियोजकाकडून निर्यातीचा अंतर्भाव असलेले नौवहन दस्तऐवज परक्रांत करण्यासाठी किंवा वसुलीसाठी स्वीकारण्याची परवानगी दिली असेल, त्यावेळी असा प्राधिकृत विक्रेता असे दस्तऐवज परक्रांत करण्यासाठी किंवा वसुलीसाठी स्वीकारण्यापूर्वी संबंधित नियोजकालाही अशा घोषणापत्रावर सही करायला फर्मावील आणि त्यानंतर असा नियोजक अशा फर्मानाचे पालन करण्यास बांधील राहील आणि मूळ घोषणाकार आणि घोषणापत्रावर स्वाक्षरी करणारा असा नियोजक यांच्यापैकी प्रत्येकाला या कलमाच्या प्रयोजनासाठी निर्यातदार समजण्यात येईल, आणि तद्नुसार त्याच्या उपबंधाद्वारे त्याचे नियमन करण्यात येईल.

(९) पोट-कलम (१) च्या उपबंधांना बाध न आणता, त्या पोट-कलमाच्या खंड (क) खालील अधिसूचना लागू होणाऱ्या मालाच्या निर्यातीच्या संबंधात, त्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य, किंवा, प्रकरणपरत्वे, बाजारपेठेतील विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन मालाची विदेशी बाजारपेठेत विक्री केल्यानंतर जे मूल्य मिळण्याची निर्यातदाराला अपेक्षा असेल ते मूल्य, योग्य वेळेवर किंवा अविलंब मिळण्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी रिझर्व्ह बँक, कोणत्याही नियतस्थळी मालाची निर्यात, किंवा निर्यात व्यवहारांचा कोणताही वर्ग किंवा मालाचा कोणताही वर्ग किंवा निर्यातदारांचा वर्ग यांच्या संबंधात आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे पुढील पैकी कोणत्याही किंवा सर्व शर्तींचे निर्यातदार, मालाच्या निर्यातीपूर्वी पालन करील, असा निदेश सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी देऊ शकेल;

त्या शर्ती अशा :—

(क) मालाच्या विक्रीसाठी केलेली कोणतीही संविदा किंवा इतर व्यवस्था यांची नोंदणी आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पद्धतीने आणि अशा प्राधिकरणाकडे किंवा संघटनेकडे करण्यात येईल ;

(ख) मालासाठी करावयाचे प्रदान हे, रद्द न करता येण्याजोग्या पतपत्राने किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर व्यवस्थेने किंवा दस्तऐवजाने करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (१) अन्वये विहित प्राधिकाऱ्याला द्यावयाची घोषणापत्राची प्रत, अशा घोषणापत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेले मालाचे मूल्य हे त्याचे उचित मूल्य आहे, असे प्रमाणित करण्यासाठी अशा प्राधिकाऱ्याला किंवा संघटनेला सादर करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (१) खालील विहित प्राधिकाऱ्याला द्यावयाचे कोणतेही घोषणापत्र रिझर्व्ह बँकेला, तिच्या पूर्वमान्यतेसाठी सादर करण्यात येईल, रिझर्व्ह बँक परिस्थिती लक्षात घेऊन पूर्वमान्यता देऊ किंवा रोखून ठेवू शकेल किंवा रिझर्व्ह बँकेला ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने ती देऊ शकेल :

परंतु, निर्यातदाराला त्याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय रिझर्व्ह बँक या खंडान्वये कोणतीही मान्यता रोखून ठेवणार नाही.

(१०) ज्यावेळी केंद्र सरकारचे असे मत असेल की, कोणताही माल किंवा मालाचा वर्ग किंवा निर्यातदारांचा वर्ग याबाबतीत किंवा कोणत्याही नियतस्थळी करावयाच्या निर्यातीच्या बाबतीत, माल निर्यातदारांच्या खात्यावर विकण्यात येईल आणि अशा विक्रीचा हिशेब निर्यातदाराला देण्यात येईल, या आशयाच्या एखाद्या अटीवर माल निर्यात करण्याच्या प्रथेमुळे असा परिणाम झाला आहे किंवा होण्याची शक्यता आहे की, त्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य विहित पद्धतीने किंवा विहित कालावधीत भारतात आणले गेले नाही किंवा जाणार नाही. तर केंद्र सरकार अशा मालाची किंवा मालाच्या वर्गाची अशा निर्यातदाराकडून किंवा अशा नियतस्थळी, अशा अटीनुसार निर्यात करण्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, मनाई करू शकेल.

[भाडेपट्टयाने देणे, भाड्याने देणे किंवा इतर व्यवस्था यांसाठी प्रदान.

[१]१८क. कोणतीही व्यक्ती रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीशिवाय, कोणताही माल भूमार्गे, जलमार्गे किंवा हवाईमार्गे, भारतातून कोणत्याही ठिकाणी, अशा मालाची विक्री करून किंवा इतर प्रकारे विल्हेवाट लावून असेल ते खेरीज करून, भाडेपट्ट्याने किंवा भाड्याने किंवा कोणत्याही इतर व्यवस्थेद्वारे पाठवणार नाही किंवा स्वीकारणार नाही].

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम ७ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

१९. (१) कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ८१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही व्यक्ती, रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने असेल त्याखेरीज,— प्रतिभूतींची निर्यात व हस्तांतरण यांचे विनियमन.

(क) भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी, कोणतीही प्रतिभूती नेणार किंवा पाठवणार नाही ;

(ख) भारताबाहेरील कोणत्याही निवासी व्यक्तीला किंवा तिच्या बाजूने कोणतीही प्रतिभूती हस्तांतरित करणार नाही किंवा एखाद्या प्रतिभूतीमध्ये कोणताही हितसंबंध निर्माण किंवा हस्तांतरित करणार नाही ;

[1]* * * * * * *

(घ) भारतामध्ये जिची नोंदणी झालेली किंवा व्हावयाची आहे अशी कोणतीही प्रतिभूती भारताबाहेरील रहिवासी व्यक्तीला भारतामध्ये किंवा अन्यत्र देणार नाही;

(ङ) कोणतीही विदेशी प्रतिभूती संपादित करणार नाही, धारण करणार नाही किंवा तिचा विनियोग करणार नाही.

(२) ज्यावेळी एखाद्या प्रतिभूतीचा धारक हा एखादी नामनिर्देशित व्यक्ती असेल त्यावेळी ती किंवा रोख्याच्या संबंधातील धारकाच्या अधिकारांपैकी सर्व किंवा कोणत्याही अधिकाराच्या वापरावर जिच्या अभिकरणामार्फत नियंत्रण ठेवले जाते अशी कोणतीही व्यक्ती, रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीशिवाय, अशी कोणतीही कृती करणार नाही की, जिच्यामुळे, जिच्यापासून त्याला थेट अनुदेश मिळत असतात ती व्यक्ती म्हणून एखाद्या अन्य व्यक्तीस तिच्या जागी प्रतिस्थापित करण्यास त्याच्याकडून मान्यता दिली जाईल किंवा ते प्रत्यक्षात आणले जाईल, मात्र, अगोदरची अनुदेश देणारी व्यक्ती आणि तिच्या जागी प्रतिस्थापित करण्यात आलेली व्यक्ती या दोघीही अशा प्रतिस्थापनाच्या निकटपूर्वी भारताच्या निवासी असतील तर ते अलाहिदा.

(३) या कलमाचे उपबंध टाळण्यात येत नाहीत याविषयी खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी रिझर्व्ह बँक कोणतीही प्रतिभूती हस्तांतरित करणाऱ्या व्यक्तीला आणि अशी प्रतिभूती ज्या व्यक्तीला हस्तांतरित करण्यात येत असेल त्या व्यक्तीला हस्तांतरिती हा भारताबाहेरील रहिवासी नाही या घोषणापत्रावर सही करायला फर्मावू शकेल.

(४) इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही व्यक्ती रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने असेल त्याशिवाय पुढील गोष्टी करणार नाही—.

(क) जर हस्तांतरणामध्ये या कलमाच्या उपबंधाच्या कोणत्याही व्यतिक्रमणाचा अंतर्भाव होत असल्याचा संशय येण्यास कोणताही आधार असेल तर, प्रतिभूतींच्या कोणत्याही हस्तांतरणाची नोंद, ज्यामध्ये प्रतिभूतींची नोंदणी करण्यात येते किंवा त्या लिहिण्यात येतात अशा कोणत्याही नोंदवहीत किंवा पुस्तकात घेणे, किंवा

(ख) अशा कोणत्याही नोंदवहीत किंवा पुस्तकात कोणत्याही प्रतिभूतींच्या संबंधात, मग ती प्रतिभूती देण्याच्या बाबतीत असो किंवा हस्तांतरित करण्याच्या बाबतीत असो, किंवा अन्यथा असो, अशा कोणत्याही पत्त्याच्याऐवजी त्याच देशातील दुसऱ्या पत्त्याच्या नोंदीच्या स्वरूपात असेल किंवा उक्त पत्त्याच्या नोंदीचा त्यामध्ये अंतर्भाव आहे हे माहीत असताना या कलमान्वये ज्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे, अशा कोणत्याही व्यवहाराच्या प्रयोजनासाठी असेल त्याखेरीज एखाद्या भारताबाहेरील पत्त्याची नोंद करणे ;

[2]* * * * * * *

[3][(५) इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, भारतामध्ये नोंदणी झालेल्या एखाद्या कंपनीचा कोणताही शेअर, बंधपत्र किंवा ऋणपत्र भारताबाहेरील एखाद्या रहिवासी व्यक्तीने किंवा एखाद्या विदेशी नागरिकाने दुसऱ्या व्यक्तीकडे—मग ती भारतातील रहिवासी असो किंवा भारताबाहेरील रहिवासी असो—हस्तांतरित केले तर, हस्तांतरकर्त्याचे किंवा हस्तांतरितीचे याबाबत अर्ज केल्यावरून रिझर्व्ह बँकेने दृढ केले असेल त्याखेरीज असे हस्तांतरण वैध होणार नाही.

(६) लोकहिताच्या दृष्टीने असे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे रिझर्व्ह बँकेचे मत असेल तर, तिला सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीद्वारे पोट-कलम (५) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या कोणत्याही हस्तांतरणाला किंवा हस्तांतरणांच्या कोणत्याही वर्गाला, त्या परवानगीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांच्या अधीनतेने त्या पोट-कलमांच्या उपबंधाच्या प्रवर्तनापासून सूट देता येईल.]

---

१. १९९३ चा अधिनियम २९ कलम ८ (क) द्वारे वगळण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ख) द्वारे वगळण्यात आले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ग) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी नवीन पोटकलमे समाविष्ट केली.

(७) या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क्) धारक प्रतिभूतीच्या संबंधात "धारक" म्हणजे, प्रतिभूती जिच्या प्रत्यक्ष अभिरक्षेत आहे अशी व्यक्ती, परंतु ज्यावेळी एखादी दर्शनी प्रतिभूती कोणत्याही व्यक्तीकडे एखाद्या कुलुपबंद किंवा मुद्रांकित आधानकात चालून जमा करण्यात आली असेल आणि ज्या व्यक्तीकडे ती जमा करण्यात आली आहे तिला दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या प्राधिकाराशिवाय ती तेथून काढण्याचा हक्क नसेल, त्यावेळी ती दुसरी व्यक्ती त्या प्रतिभूतीची धारक समजण्यात येईल.

(ख्) "नामनिर्देशिती" म्हणजे, कोणत्याही प्रतिभूतीचा, दर्शनी प्रतिभूतीसह किंवा लाभांश किंवा व्याज दर्शवणाऱ्या कोणत्याही कुपनाचा धारक, ज्याला त्या प्रतिभूतीच्या किंवा कुपनाच्या संबंधातील कोणत्याही अधिकाराचा वापर दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने दिलेल्या निदेशानुसार असेल त्याखेरीज करण्याचा हक्क नसतो, आणि नामनिर्देशिती म्हणून प्रतिभूती किंवा कूपन धारण करणारी व्यक्ती ही त्या प्रतिभूतीच्या किंवा कुपनाच्या धारकाने त्यांच्या संबंधातील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याबाबत थेट किंवा एका किंवा अधिक व्यक्तींच्या अभिकरणामार्फत अनुदेश देण्याचा जिला हक्क आहे आणि असे करताना ती व्यक्ती दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने दिलेल्या अनुदेशांचे पालन करण्यास कर्तव्यबद्ध नसते अशा व्यक्तीसाठी नामनिर्देशिती म्हणून काम करीत असल्याचे समजण्यात येईल.

२०. (विवक्षित प्रतिभूतींच्या संबंधात प्रदानावरील निर्बंध) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम ९ द्वारे निरसित.

२१. (प्रतिभूतींची अभिरक्षा) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३, (१९९३ चा २९) कलम ९ द्वारे निरसित.

धारक प्रतिभूती काढण्यावरील निर्बंध. २२. [1] * * * * * * रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीस भारतात आणि कोणत्याही भारतातील निवासी व्यक्तीला भारताबाहेर, कोणतेही धारक प्रमाणपत्र किंवा कूपन निर्माण करता किंवा काढता येणार नाही, किंवा कोणत्याही दस्तऐवजामध्ये असा फेरबदल करता येणार नाही की, त्यायोगे त्याचे धारक प्रमाणपत्र किंवा कूपन होईल.

२३. (विदेशी प्रतिभूतीचे केंद्र सरकारकडून संपादन) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम ११ द्वारे निरसित.

व्यवस्था इत्यादीवरील निर्बंध. २४. भारतातील कोणतीही रहिवासी व्यक्ती, रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने असेल त्याखेरीज, कोणत्याही संपत्तीची अशी कोणतीही व्यवस्था करणार नाही किंवा देणगी देणार नाही की, ज्यामुळे व्यवस्था करण्याच्या किंवा देणगी देण्याच्या वेळी रिझर्व्ह बँकेने याबाबतीत अधिसूचित केलेल्या भारताबाहेरील क्षेत्राखेरीज इतर क्षेत्राची रहिवासी असेल अशा एखाद्या व्यक्तीचा त्या संपत्तीत हितसंबंध निर्माण होईल, किंवा प्रदानाच्या कोणत्याही शक्तीचा वापर, असा वापर करण्याच्या वेळी भारताबाहेरील अशा अधिसूचित क्षेत्राखेरीज इतर क्षेत्राच्या रहिवासी व्यक्तीच्या नावाने करणार नाही :

परंतु, रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय उपरोक्तप्रमाणे केलेली कोणतीही व्यवस्था किंवा दिलेली देणगी किंवा कोणत्याही शक्तीचा उपरोक्तप्रमाणे केलेला वापर हा, केवळ अशी परवानगी घेण्यात आलेली नाही, एवढ्या एकाच आधारावर अवैध ठरणार नाही.

भारताबाहेर स्थावर संपत्ती धारण करण्यावर निर्बंध. २५. (१) भारतातील कोणत्याही रहिवासी व्यक्ती [2][रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने] असेल त्याखेरीज भारताबाहेर असलेली कोणतीही स्थावर संपत्ती संपादित करणार नाही किंवा धारण करणार नाही किंवा विक्री, गहाण, भाडेपट्टा, देणगी, व्यवस्था याद्वारे किंवा अन्यथा तिची विल्हेवाट लावणार नाही :

परंतु पाच वर्षे किंवा त्याहून कमी कालावधीच्या भाडेपट्टयाद्वारे अशा कोणत्याही स्थावर संपत्तीच्या संपादनास किंवा हस्तांतरणास या पोट-कलमातील काहीही लागू होणार नाही.

(२) भारतातील कोणतीही रहिवासी व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी, भारताबाहेर कोणतीही स्थावर संपत्ती धारण करीत असेल तर, ती व्यक्ती अशा प्रारंभापासून तीन महिन्यांचा कालावधी संपण्याच्या आत किंवा, याबाबतीत रिझर्व्ह बँक मुभा देईल असा आणखी पुढील कालावधी संपण्याच्या आत, रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील असा तपशील समाविष्ट असेल, अशा नमुन्यामध्ये, असे धोरण रिझर्व्ह बँक घोषित करील.

[3]* * * * * * *

(४) या कलमातील कोणतीही गोष्ट विदेशी राज्याच्या नागरिकास लागू होणार नाही.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम १० द्वारे वगळण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १२ (क्) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १२ (ख्) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[1][२६. केंद्र सरकारच्या किंवा रिझर्व बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने असेल त्या-शिवाय, भारतातील कोणतीही रहिवासी व्यक्ती :—

ऋण किंवा इतर आबंधने यांच्या संबंधातील हमी-बाबत विवक्षित उपबंध.

(एक) भारतातील रहिवासी व्यक्तीचे, आणि भारताबाहेरील व्यक्तीला देय किंवा देणे असलेले, किंवा

(दोन) भारताबाहेरील रहिवासी व्यक्तीचे, कोणतेही ऋण किंवा इतर आबंधन किंवा दायित्व यांच्या संबंधात हमी देणार नाही.]

२७. (भारतातील निवासी व्यक्तीने भारताबाहेरील संस्थेमध्ये स्वत:ला सहयोगी करण्यावरील किंवा त्यामध्ये भाग घेण्यावरील निर्बंध) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम १४ द्वारे निरसित.

२८. [2][(१) कलम ४७ च्या उपबंधांना बाध न आणता व या अधिनियमाच्या किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कोणत्याही अन्य उपबंधात काहीही असले तरी, भारता-बाहेरील रहिवासी व्यक्ती (ती, भारताची नागरिक असो किंवा नसो) किंवा जी भारताची नागरिक नाही पण भारतातील रहिवाशी आहे अशी एखादी व्यक्ती किंवा भारतात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे संस्थापित न झालेली बँक व्यवसायी कंपनीहून अन्य अशी एखादी कंपनी किंवा अशा कंपनीची कोणतीही शाखा रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीखेरीज कोणत्याही व्यक्तीचा किंवा कंपनीचा भारतातील अभिकर्ता म्हणून अशा व्यक्तीच्या किंवा कंपनीच्या व्यापारी किंवा वाणिज्यिक व्यवहारात कार्य करणार नाही किंवा नियुक्ती स्वीकारणार नाही.

विवक्षित व्यक्तींना व कंपन्यांना भारतात अभिकर्ते, तंत्र किंवा व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करण्यावर निर्बंध.

(२) ज्यावेळी, पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेली अशी कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून), रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय असा अभिकर्ता म्हणून कार्य करते किंवा नियुक्ती स्वीकारते त्यावेळी असे कार्य किंवा नियुक्ती रद्दबातल होईल.

(३) ज्यावेळी पोटकलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) त्या पोट कलमात निर्देश करण्यात आलेला असा कोणताही अभिकर्ता म्हणून या अधिनियमाच्या प्रारंभाच्यावेळी कार्य करीत असेल किंवा नियुक्ती धारण करीत असेल त्यावेळी अशी व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) अशा प्रारंभापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत किंवा याबाबतीत रिझर्व्ह बँक मुभा देईल अशा आणखी कालावधीच्याआत असा अभिकर्ता म्हणून कार्य करण चालू ठेवण्यास परवानगी देण्यासाठी रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात व असा तपशील समाविष्ट करून, रिझर्व्ह बँकेकडे अर्ज करील.]

(४) पोट कलम (३) अन्वयेचा अर्ज मिळाल्यावर रिझर्व्ह बँक तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, रिझर्व्ह बँकेला योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांच्या अधीनतेने तो अर्ज एकतर मंजूर करील किंवा फेटाळील :

परंतु, अर्ज अशा रीतीने फेटाळण्याचा ज्यांच्यावर परिणाम होणार आहे त्या व्यक्तींना याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय या पोटकलमान्वये कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही.

(५) ज्यावेळी कोणताही अर्ज पोटकलम (४) अन्वये फेटाळण्यात आला असेल त्यावेळी कार्य करणे, नियुक्ती धारण करणे किंवा, प्रकरणपरत्वे, परवानगी अर्ज फेटाळण्यात आला असल्याची सूचना संबंधित व्यक्तीस किंवा कंपनीस (तिची शाखा धरून) ज्या तारखेस मिळाली असेल त्या तारखेपासून नव्वद दिवसांचा कालावधी संपल्यानंतर किंवा रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशी एखादी नंतरची तारीख उलटल्यानंतर शून्य होईल.

(६) ज्यावेळी पोटकलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीने किंवा कंपनीने (तिची शाखा धरून) कोणताही अर्ज केलेला नसेल त्यावेळी रिझर्व्ह बँक आदेशाद्वारे अशा व्यक्तीस किंवा कंपनीस (तिची शाखा धरून) असा निर्देश देऊ शकेल की, त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या समाप्तीनंतर तिने असे कार्य करणे [3] * * * * बंद करावे :

परंतु, अशा निदेशांचा ज्यांच्यावर परिणाम होणार असेल त्या व्यक्तींना याबाबतीत अभिवेदन करण्यास वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय या पोटकलमान्वये कोणतेही निदेश दिले जाणार नाहीत.

(७) ज्यावेळी पोटकलम (६) अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) करणार नाही, त्यावेळी या अधिनियमान्वये करता येत असेल अशा कोणत्याही कारवाईस बाध न आणता ते कार्य, [4] * * * * * * त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या समाप्तीपासून रद्द ठरेल.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम १३ द्वारे मूळ कलमाऐवजी नवीन कलम दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ पोट कलमांऐवजी नवीन पोट कलमे समाविष्ट केली.

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ (ख) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १५ (ग) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) "अभिकर्ता" यात, जी कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) कोणताही माल, त्यावर कोणतीही प्रक्रिया करण्यापूर्वीच, त्याची विक्री करण्यासाठी खरेदी करते, तिचा समावेश आहे;

(ख) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे व त्यामध्ये एखाद्या पेढीचा किंवा इतर व्यक्तिसंघाचा समावेश आहे;

(ग) "प्रक्रिया" याचा अर्थ, एखाद्या वस्तूचे उत्पादन करण्यासाठी ती तयार करण्यासाठी किंवा बनवण्यासाठी हाताने, यांत्रिक, रासायनिक, विजेच्या किंवा तशाच प्रकारची इतर एखादी क्रिया कोणत्याही सामग्रीवर घडवून आणण्याची कोणतीही कला किंवा प्रक्रिया असा आहे, परंतु त्यामध्ये, एखाद्या उत्पादनाच्या निर्मितीस आनुषंगिक किंवा सहाय्यभूत होणारी विभागणी, दाबणी असा आहे परंतु, त्यामध्ये संपीडन, आवेष्टन, पुनरावेष्टन, लेबल लावणे, पुन्हा लेबल लावणे, छाप मारणे, यांसारख्या कोणत्याही प्रक्रियेचा किंवा ते उत्पादन उपभोक्त्याला विकण्यास योग्य असे बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल अशा कोणत्याही उपचाराचा समावेश नाही.

[१]* * * * *

**भारतात कामधंद्याची जागा स्थापित करण्यावरील निर्बंध.** २९. (१) कलम २८ व कलम ४७ यांच्या उपबंधांना बाध न आणता आणि या अधिनियमाच्या किंवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या अन्य कोणत्याही उपबंधात काहीही अंतर्भूत असले तरीही, एखादी भारताबाहेरील रहिवासी व्यक्ती (मग ती भारताची नागरिक असो किंवा नसो) किंवा जी भारताची नागरिक नाही पण भारतातील रहिवासी आहे, ती व्यक्ती किंवा भारतात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे संस्थापित न झालेली [२]* * * * * अशी एखादी कंपनी (बँक व्यवसायी कंपनीखेरीज इतर) किंवा अशा कंपनीची कोणतीही शाखा रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीखेरीज,—

(क) जे काम करण्यासाठी कलम २८ अन्वये रिझर्व्ह बँकेची परवानगी घेण्यात आलेली आहे त्या कामाहून अन्य व्यापारी, वाणिज्यिक किंवा औद्योगिक स्वरुपाचे कोणतेही काम करण्यासाठी भारतात शाखा, कार्यालय किंवा कामधंद्याचे इतर ठिकाण चालवणार नाही किंवा स्थापन करणार नाही, किंवा

(ख) कोणताही व्यापार, वाणिज्य किंवा उद्योग चालवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा कंपनीचा भारतातील कोणताही उपक्रम संपूर्णपणे किंवा त्याचा कोणताही भाग संपादित करणार नाही किंवा अशा कोणत्याही कंपनीचे भारतात भाग खरेदी करणार नाही.

[३][(१क) जिच्यामध्ये अनिवासींचे हितसंबंध चाळीस टक्क्यांहून अधिक आहेत अशी एखादी (बँक व्यवसायी कंपनीखेरीज इतर) कंपनी, रिझर्व्ह बँकेची सर्वसाधारण किंवा विशेष परवानगी घेतल्या खेरीज एरव्ही, भारतात कृषी किंवा लागवडी संबंधातील कोणतेही काम करणार नाही किंवा कृषी किंवा लागवड करण्यासंबंधातील कोणतेही काम करणाऱ्या एखाद्या व्यक्तीचा किंवा कंपनीचा भारतातील उपक्रम संपूर्णतः किंवा त्याचा कोणताही भाग संपादित करणार नाही किंवा अशा कोणत्याही कंपनीचे भाग खरेदी करणार नाही.]

(२) (क) ज्यावेळी पोटकलम १ मध्ये निर्देश केलेली कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी, पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्देश केलेले कोणतेही काम करीत असेल किंवा अशा प्रारंभाच्या वेळी असे काम करण्यासाठी तिने एखादी शाखा, कार्यालय किंवा कामधंद्याची जागा स्थापित केली असेल त्यावेळी अशी व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) अशा प्रारंभापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत किंवा रिझर्व्ह बँक याबाबतीत मुभा देईल अशा आणखी कालावधीच्या आत रिझर्व्ह बँकेकडे असे काम करणे चालू ठेवण्यात किंवा प्रकरणपरत्वे, असे काम करण्यासाठी शाखा, कार्यालय किंवा कामधंद्याची जागा स्थापित करणे चालू ठेवण्यास परवानगी मिळण्याकरिता अर्ज करूशकेल ;

(ख) खंड (क) अन्वये करण्यात आलेला प्रत्येक अर्ज रिझर्व्हबँकेकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात किंवा असा तपशील अंतर्भूत असलेला असा असेल ;

(ग) ज्यावेळी खंड (क) अन्वये कोणताही अर्ज करण्यात येईल, त्यावेळी रिझर्व्ह बँक तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर एकतर रिझर्व्ह बँकेला लादणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्या शर्तींच्या अधीनतेने तो अर्ज मंजूर करू शकेल किंवा फेटाळू शकेल ;

परंतु, असा अर्ज फेटाळण्याचा ज्यांच्यावर परिणाम होणार असेल त्या व्यक्तींना याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय कोणताही अर्ज फेटाळला जाणार नाही ;

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम १५ (घ) द्वारे वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) द्वारे वगळण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ (ख) द्वारे नवीन पोट कलम समाविष्ट करण्यात आले.

(घ) ज्यावेळी रिझर्व्ह बँकेने खंड (ग) अन्वये एखादा अर्ज फेटाळला असेल त्यावेळी संबंधित व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) असे काम करणे बंद करील किंवा असे काम करण्यासाठी स्थापित केलेली शाखा, कार्यालय किंवा, प्रकरणपरत्वे, कामधंद्याची इतर जागा, अशा व्यक्तीला किंवा कंपनीला (तिची शाखा धरून) अर्ज अशा रीतीने फेटाळण्यात आला असल्याची सूचना मिळाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यावर किंवा रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा नंतरच्या एखाद्या तारखेस बंद करील.

(ङ) ज्यावेळी कोणत्याही व्यक्तीने, कंपनीने (तिची शाखा धरून) खंड (क) अन्वये कोणताही अर्ज केला नसेल—त्यावेळी रिझर्व्ह बँक त्या निदेशास विनिर्दिष्ट करील असा कालावधी संपल्यावर, अशा व्यक्तीला किंवा कंपनीला (तिची शाखा धरून) असे काम करणे बंद करण्याचा किंवा असे काम करण्यासाठी स्थापित केलेली शाखा, कार्यालय किंवा, प्रकरणपरत्वे, कामधंद्याची इतर जागा बंद करण्याचा निदेश आदेशाद्वारे देऊ शकेल ;

परंतु, ज्यांच्यावर अशा निदेशाचा परिणाम होणार असेल, त्यांना याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय त्यांना या खंडान्वये कोणताही निदेश दिला जाणार नाही.

(३) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, रिझर्व्ह बँक—

(एक) पोटकलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी त्या पोटकलमाच्या खंड (क) मध्ये निर्देश करण्यात आलेले कोणतेही काम करीत आहे किंवा अशा प्रारंभाच्या वेळी ते काम करण्यासाठी तिने शाखा, कार्यालय किंवा कामधंद्याची इतर जागा स्थापित केली आहे अशा प्रत्येक बाबीत केंद्र सरकारद्वारे देण्यात आलेल्या परवानगीच्या किंवा लायसनच्या अनुषंगाने तिने ते केलेले आहे ही वस्तुस्थिती; आणि

(दोन) अशी व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) जे काम करीत आहे किंवा जे काम करण्याचा तिचा उद्देश आहे त्या कामाचे स्वरूप,

या गोष्टींचा विचार करून, आदेशाद्वारे,—

(क) अशा व्यक्तीस किंवा कंपनीस (तिची शाखा धरून), किंवा

(ख) अशा व्यक्तीच्या किंवा कंपन्यांच्या (त्यांच्या शाखा धरून) कोणत्याही वर्गात,

त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कामांच्या संबंधात पोटकलम (२) च्या उपबंधाच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल :

परंतु, ज्यावेळी जे काम करण्यात येत आहे किंवा जे करण्याचा उद्देश आहे ते केवळ व्यापाराच्या स्वरूपाचे असेल अशा एखाद्या प्रकरणी रिझर्व्ह बँक कोणताही आदेश देणार नाही.

(४) (क) ज्यावेळी पोटकलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) त्या पोटकलमाच्या खंड (ख) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या कोणत्याही कंपनीचे कोणतेही भाग भारतामध्ये, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी धारण करीत असेल त्यावेळी अशी व्यक्ती किंवा कंपनी (तिची शाखा धरून) अशा प्रारंभापासून सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी, किंवा रिझर्व्ह बँक याबाबतीत मुभा देईल अशा आणखी कालावधीच्या समाप्ती पूर्वी, अशा व्यक्तीने किंवा कंपनीने (तिची शाखा धरून) रिझर्व्ह बँकेकडे असे भाग धारण करणे चालू ठेवल्यास परवानगी देण्यासाठी रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात किंवा असा तपशील अंतर्भूत केलेला अर्ज केला असल्याखेरीज असे भाग धारण करणे चालू ठेवण्यास हक्कदार असणार नाही.

(ख) ज्यावेळी खंड (क) अन्वये एखादा अर्ज करण्यात येईल त्यावेळी रिझर्व्ह बँक तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर रिझर्व्ह बँकेला लादणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती असतील तर त्यांच्या अधीनतेने तो अर्ज मंजूर करू शकेल किंवा तो अर्ज फेटाळू शकेल :

परंतु, अर्ज अशा रीतीने फेटाळण्याचा ज्या व्यक्तींवर परिणाम होणार असेल त्यांना या बाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय या खंडातील कोणताही अर्ज फेटाळला जाणार नाही.

(ग) ज्यावेळी एखादा अर्ज खंड (ख) अन्वये फेटाळण्यात आला असेल किंवा, ज्यावेळी खंड (क) अन्वये कोणताही अर्ज करण्यात आलेला नसेल, त्यावेळी रिझर्व्ह बँक, जर तिचे असे मत असेल की, परकीय चलन वाचवण्याच्या प्रयोजनार्थ तसे करणे समयोचित आहे तर, अशा व्यक्तीस किंवा कंपनीस (तिची शाखा धरून) अशा भागांची विक्री करण्याचा किंवा विक्री करवण्याचा निदेश देऊ शकेल :

परंतु, अशा निदेशाचा परिणाम होणाऱ्या व्यक्तीला किंवा कंपनीला (तिची शाखा धरून) कमीत कमी नव्वद दिवसांच्या कालावधीची नोटीस देण्यात आल्याशिवाय या खंडान्वये कोणताही निदेश दिला जाणार नाही.

[1][ स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) "कंपनी" याचा अर्थ, कलम २८ च्या स्पष्टीकरणाच्या खंड (ख) मध्ये जो अर्थ आहे, तोच असेल ;

(दोन) "अनिवासींचे हितसंबंध" याचा अर्थ, भारताबाहेरील कोणत्याही व्यक्तीचा किंवा कंपनीचा किंवा भारतात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे संस्थापित न झालेल्या कोणत्याही कंपनीचा किंवा अशा कंपनीच्या कोणत्याही शाखेचा मग ती शाखा भारताबाहेरील असो वा नसो भाग भांडवलातील सहभाग किंवा वाटपयोग्य द्यावयाच्या नफ्यातील त्यांचा हक्क, असा आहे.]

विदेशी राज्यांच्या नागरिकांना भारतात सेवायोजन इ. स्वीकारण्यात रिझर्व्ह बँकेची पूर्व-परवानगी आवश्यक असणे.

३०. [2][ (१) एखाद्या विदेशी राज्याचा कोणताही नागरिक ज्यावेळी एखादा व्यवसाय करून किंवा आजीविका, व्यापार किंवा प्रकरणपरत्वे, धंदा चालवून भारतात मिळवलेल्या कोणत्याही पैशातून कोणतेही परकीय चलन (असे परकीय चलन भारताबाहेर प्रेषित करण्याचा उद्देश असला पाहिजे) मिळवू इच्छित असेल; त्यावेळी ती रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगी शिवाय—

भारतात असा कोणताही व्यवसाय करणार नाही किंवा अशी कोणतीही आजीविका, व्यापार किंवा धंदा चालवणार नाही.]

(२) ज्यावेळी विदेशी राज्याच्या कोणत्याही नागरिकाची पोटकलम (१) अन्वये रिझर्व्ह बँकेची परवानगी मिळवण्याची इच्छा असेल त्यावेळी त्याला विहित करण्यात येईल अशा नमुन्यात अशा रीतीने व अशा तपशील अंतर्भूत असलेला अर्ज रिझर्व्ह बँकेकडे करता येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये एखादा अर्ज आल्यावर रिझर्व्ह बँक तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर तिला लादणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती असतील तर, त्या शर्तीच्या अधीनतेने अर्ज मंजूर करू शकेल किंवा अर्ज फेटाळू शकेल :

परंतु, अर्जदाराला याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय या पोट कलमान्वये कोणताही अर्ज फेटाळला जाणार नाही.

भारतात स्थावर संपत्ती संपादन करणे, ती धारण करणे इ. वरील निर्बंध.

३१. (१) जी भारताची नागरिक नाही अशी कोणतीही व्यक्ती, तसेच जी भारताबाहेर अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारें संस्थापित झालेली नाही [3] * * * * अशी कोणतीही कंपनी (बँक व्यवसायी कंपनीखेरीज इतर) रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण किंवा विशेष पूर्व परवानगीने असेल त्याशिवाय, भारतामध्ये स्थित असलेली कोणतीही स्थावर संपत्ती संपादित करणार नाही किंवा धारण करणार नाही किंवा विक्री, गहाण, भाडेपट्टा, देणगी, व्यवस्था याद्वारें किंवा अन्यथा ती हस्तांतरित करणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावणार नाही :

परंतु, या पोटकलमातील काहीही, अशी कोणतीही स्थावर संपत्ती पाच वर्षे किंवा त्याहून कमी कालावधीच्या भाडेपट्ट्याने संपादित किंवा हस्तांतरित करण्यास लागू होणार नाही.

(२) भारतात स्थित असलेली कोणतीही स्थावर संपत्ती संपादित करण्यासाठी किंवा धारण करण्यासाठी किंवा विक्री, गहाण, भाडेपट्ट्याने व्यवस्था, याद्वारे किंवा अन्यथा ती हस्तांतरित करण्यासाठी किंवा तिची विल्हेवाट लावण्यासाठी, पोटकलम (१) अन्वये जिला विशेष परवानगीची आवश्यकता असेल, अशी त्या पोटकलमात निर्देश करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी, रिझर्व्ह बँकेकडे, रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात व असा तपशील अंतर्भूत असलेला अर्ज करू शकेल.

(३) पोटकलम (२) अन्वये एखादा अर्ज मिळाल्यानंतर रिझर्व्ह बँक, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर एकतर अर्ज केलेली परवानगी देऊ शकेल किंवा नाकारू शकेल :

परंतु, अर्जदाराला याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय कोणतीही परवानगी नाकारली जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, रिझर्व्ह बँकेला ज्या तारखेस अर्ज मिळाला असेल त्या तारखेपासून नव्वद दिवसांचा कालावधी संपण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेने अर्जदाराला अर्ज केलेली परवानगी नाकारण्यात आल्याची सूचना पाठवली नाही तर, रिझर्व्ह बँकेने अशी परवानगी दिली आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

स्पष्टीकरण.—दुसऱ्या परंतुकाच्या प्रयोजनार्थ, नव्वद दिवसांच्या कालावधीची गणना करताना, रिझर्व्ह बँकेने पहिल्या परंतुकान्वये अभिवेदन करण्याची संधी अर्जदाराला देण्यासाठी कोणताही कालावधी घेतला असेल तर तो वगळण्यात येईल.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम १६ (ग) द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे वगळण्यात आले.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी भारतात स्थित असलेली कोणतीही स्थावर संपत्ती धारण करणारी, पोटकलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती व कंपनी, अशा प्रारंभापासून नव्वद दिवसांचा किंवा रिझर्व्ह बँक याबाबतीत मुभा देईल असा आणखी कालावधी संपण्यापूर्वी, रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात, अशा व्यक्तीने किंवा कंपनीने धारण केलेल्या एका किंवा अनेक स्थावर संपत्तीच्या बाबतीत घोषणा करील.

३२. (भारताबाहेर प्रवासासाठी आरक्षण करण्याचे विनियमन व विदेश प्रवासावरील निर्बंध.) परकीय चलन विनियमन (विशोधन) अधिनियम, १९९३ (१९९३ चा २९) कलम १९ द्वारे निरसित.

**माहिती मागण्याची शक्ती.**

३३. (१) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे कोणतेही अपवाद असल्यास त्यांच्या अधीनतेने, अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परकीय चलनाच्या किंवा विदेशी प्रतिभूतींच्या किंवा भारताबाहेर धारण केलेल्या स्थावर संपत्तीच्या मालकांना निदेश देऊ शकेल की, त्यांनी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीच्या आत आणि असा तपशील दिलेले त्यासंबंधीचे विवरण रिझर्व्ह बँकेला सादर करावे किंवा विवरणे वेळोवेळी सादर करावी.

(२) ज्यावेळी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकारला किंवा रिझर्व्ह बँकेला किंवा मुख्य अंमलबजावणी अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही अंमलबजावणी अधिकाऱ्याला, कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यातील कोणतीही माहिती, पुस्तक किंवा अन्य दस्तऐवज मिळवून त्याची तपासणी करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे वाटत असेल, किंवा जी केंद्र सरकारच्या किंवा रिझर्व्ह बँकेच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या मते, अशा व्यक्तीस मिळवून सादर करता येणे शक्य आहे, त्यावेळी केंद्र शासन किंवा रिझर्व्ह बँक किंवा प्रकरणपरत्वे, असा अधिकारी (जिचे नाव आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल) अशा कोणत्याही व्यक्तीला लेखी आदेशाद्वारे अशी माहिती, पुस्तक किंवा अन्य दस्तऐवज केंद्र शासनाला किंवा रिझर्व्ह बँकेला किंवा अशा अधिकाऱ्याला किंवा त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीला सादर करण्यास किंवा मिळवून सादर करण्यास फर्मावू शकेल व त्यानंतर अशी मागणी पूर्ण करण्यास अशी व्यक्ती बांधलेली असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या, कलम ३४ व कलमे ३६ ते ४१ (दोन्ही धरून) यांच्या प्रयोजनासाठी "दस्तऐवज" यामध्ये, भारतीय चलन, परकीय चलन व लेखा पुस्तके यांचा समावेश आहे.

**संशयित व्यक्तींची झडती घेण्याची व दस्तऐवज जप्त करण्याची शक्ती.**

३४. (१) जर केंद्र सरकारने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही बजावणी अधिकाऱ्याला असे वाटण्यास कारण असेल की, कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणात किंवा कार्यवाहीत उपयुक्त किंवा संबद्ध असतील असे कोणतेही दस्तऐवज आपल्या अंगावर किंवा आपल्या ताब्यात, मालकीत किंवा नियंत्रणाखाली लपवून ठेवले आहेत, तर त्याला त्या व्यक्तीची किंवा वस्तूची झडती घेता येईल व असे दस्तऐवज जप्त करता येतील.

(२) जेव्हा कोणत्याही बजावणी अधिकाऱ्यास या कलमाच्या उपबंधान्वये कोणत्याही व्यक्तीची झडती घ्यावयाची असेल तेव्हा, तो अधिकारी, जर अशा व्यक्तीने तसे फर्माविले तर तिला, दर्जाने त्याच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या निकटतम राजपत्रित अधिकाऱ्याकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे अविलंब घेऊन जाईल.

(३) जर असे फर्माविण्यात आले असेल तर, बजावणी अधिकारी तसे फर्माविणाऱ्या व्यक्तीला पोटकलम (२) मध्ये निर्देश केलेल्या राजपत्रित बजावणी अधिकाऱ्यापुढे किंवा दंडाधिकाऱ्यापुढे घेऊन जाणे शक्य होईपर्यंत स्थानबद्ध ठेवू शकेल.

(४) कोणत्याही व्यक्तीला ज्याच्यासमोर आणण्यात आले असेल, त्या राजपत्रित बजावणी अधिकाऱ्याला किंवा दंडाधिकाऱ्याला जर झडती घेण्यास संयुक्तिक कारण आहे असे वाटले नाही तर तो त्या व्यक्तीची ताबडतोब सुटका करील, परंतु, नाहीतर झडती घ्यावी असा निदेश देईल.

(५) या कलमाच्या उपबंधान्वये झडती घेण्यापूर्वी, बजावणी अधिकारी दोन किंवा अधिक व्यक्तींना उपस्थित राहून झडतीला साक्षीदार राहण्यास बोलावील व त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही तसे करण्याचा लेखी आदेश तो देऊ शकेल ; व अशा व्यक्तींच्या समक्ष झडती घेतली जाईल व अशा झडतीत जप्त केलेल्या सर्व दस्तऐवजांची यादी असा अधिकारी तयार करील व असे साक्षीदार त्यावर सही करतील.

(६) कोणत्याही स्त्री ची झडती स्त्री खेरीज अन्य कोणाकडूनही घेतली जाणार नाही.

**अटक करण्याची शक्ती.**

**३५.** (१) केंद्र सरकारने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही बजावणी अधिकाऱ्याला जर असे वाटण्यास कारण असेल की, भारतातील किंवा भारतीय सीमाशुल्क जलधीतील कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी आहे तर, तो अशा व्यक्तीला अटक करू शकेल व तो शक्य असेल तितक्या लवकर तिला अशा अटकेची कारणे कळवील.

(२) पोटकलम (१) अन्वये अटक करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला अनावश्यक विलंबाशिवाय एखाद्या दंडाधिकाऱ्याकडे नेण्यात येईल.

(३) ज्यावेळी कोणत्याही बजावणी अधिकाऱ्याने पोटकलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीला अटक केली असेल, त्यावेळी अशा व्यक्तीची जामीनावर किंवा अन्यथा सुटका करण्याच्या प्रयोजनार्थ त्याला, प्रभारी अधिकाऱ्याला, पोलीस ठाण्याच्या [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] अन्वये असतात, त्याच शक्ती असतील व तो त्याच उपबंधाच्या अधीन असेल.

वाहनें थांबवण्याची व त्यांची झडती घेण्याची शक्ती.

३६. केंद्र सरकारने याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या, कोणत्याही बजावणी अधिकाऱ्याला असे वाटण्यास कारण असेल की, या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणासाठी किंवा कार्यवाहीसाठी उपयुक्त किंवा संबद्ध होईल असा कोणताही दस्तऐवज भारतात कोणत्याही विमानात किंवा वाहनात किंवा कोणत्याही प्राण्यावर किंवा कोणत्याही जलयानात किंवा भारतीय सीमाशुल्क जलधीत लपवण्यात आलेला आहे तर त्याला, कोणत्याही वेळी असे कोणतेही वाहन किंवा प्राणी किंवा जलयान थांबवता येईल किंवा विमानाच्या प्रकरणी ते थांबवण्यास किंवा उतरवण्यास भाग पाडता येईल, व,—

(क) त्या विमानाच्या, वाहनाच्या किंवा जलयानाच्या कोणत्याही भागाचा कसून शोध करता येईल किंवा त्याची झडती घेता येईल ;

(ख) त्या विमानातील, वाहनातील किंवा जलयानातील किंवा प्राण्यावरील कोणत्याही मालाची तपासणी करता येईल व झडती घेता येईल ;

(ग) वर निर्देश करण्यात आलेला असा कोणताही दस्तऐवज जप्त करता येईल ;

(घ) जर किल्ल्या देण्यात आल्या नाहीत तर, खंड (क), (ख) व (ग) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी कोणत्याही दाराचे किंवा आवेष्टनाचे कुलूप तोडता येईल.

जागांची झडती घेण्याची शक्ती.

३७. (१) सहायक सक्त वसुली संचालकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्याला असे वाटण्यास कारण असेल की, या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणासाठी किंवा कार्यवाहीसाठी त्याच्या मते, उपयुक्त किंवा संबद्ध असतील असे कोणतेही दस्तऐवज कोणत्याही ठिकाणी लपवून ठेवण्यात आलेले आहेत, तर तो कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्यास अशा कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास आणि ते जप्त करण्यास प्राधिकृत करू शकेल किंवा तो स्वत: त्याचा शोध घेऊ शकेल आणि ते जप्त करू शकेल.

(२) [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] चे झडतीसंबंधीचे उपबंध, उक्त संहितेच्या कलम १६५ च्या पोटकलम (५) मध्ये "दंडाधिकारी" हा शब्द ज्या ज्या ठिकाणी येतो त्या त्या ठिकाणी, त्याच्या जागी जणू काय "सक्तवसुली संचालक किंवा त्याच्या शक्तीचा वापर करणारा इतर अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, अशा फेरबदलाच्या अधीनतेने या कलमाखालील झडत्यांना शक्य असेल तेथवर, लागू होतील.

दस्तऐवज, इत्यादी जप्त करण्याची शक्ती.

३८. कलम ३४ किंवा कलम ३६ किंवा कलम ३७ यांच्या उपबंधास बाध न आणता, केंद्र सरकारने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्याला असे वाटण्यास कारण असेल की, या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणासाठी किंवा कार्यवाहीसाठी कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू उपयुक्त ठरेल किंवा संबद्ध असेल तर, किंवा या अधिनियमाचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचे, निदेशाचे किंवा आदेशाचे त्याच्यासंबंधात व्यतिक्रमण करण्यात आले आहे तर, असा कोणताही दस्तऐवज किंवा वस्तू तो जप्त करू शकेल.

अंगझडती घेण्याची शक्ती.

३९. सक्तवसुली संचालक किंवा केंद्र सरकारने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अन्य सक्तवसुली अधिकारी या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणाच्या किंवा कार्यवाहीच्या ओघात,—

(क) त्या अन्वेषणाशी किंवा कार्यवाहीशी यासंबद्ध असेल असा कोणताही दस्तऐवज प्रस्तुत करण्यास किंवा स्वाधीन करण्यास कोणत्याही व्यक्तीस फर्मावू शकेल ;

(ख) प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती माहीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीची अंगझडती घेऊ शकेल.

साक्ष देण्यासाठी व दस्तऐवज प्रस्तुत करण्यासाठी व्यक्तींना समन्स पाठविण्याची शक्ती.

४०. (१) कोणत्याही राजपत्रित बजावणी अधिकाऱ्यास, या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणाच्या किंवा कार्यवाहीच्या ओघात, एकतर साक्ष देण्यासाठी किंवा एखादा दस्तऐवज प्रस्तुत करण्यासाठी ज्या कोणत्याही व्यक्तीने हजर राहणे त्यास आवश्यक वाटत असेल, तिला समन्स पाठवण्याची शक्ती असेल.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

(२) दस्तऐवज प्रस्तुत करण्यासंबंधी असलेले समन्स हे पाठवण्यात आलेल्या व्यक्तीच्या ताब्यात किंवा तिच्या नियंत्रणाधीन असलेले विवक्षित विनिर्दिष्ट दस्तऐवज प्रस्तुत करण्यासाठी किंवा एका विवक्षित वर्णनाचे सर्व दस्तऐवज प्रस्तुत करण्यासाठी असू शकेल.

(३) अशा प्रकारे समन्स पाठवण्यात आलेल्या सर्व व्यक्ती या, एकतर जातीने किंवा असा अधिकारी निदेश देईल अशा प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर होण्यास बांधलेल्या राहतील आणि अशाप्रकारे समन्स पाठवण्यात आलेल्या सर्व व्यक्ती, ज्या कोणत्या विषयासंबंधात त्यांची तपासणी घेण्यात येत असेल तेव्हा, खरे निवेदन करण्यास किंवा फर्मावण्यात येतील अशी निवेदने करण्यास आणि असे दस्तऐवज प्रस्तुत करण्यास बांधलेले राहतील :

परंतु, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (१९०८ चा ५) च्या कलम १३२ खालील सूट या कलमाखाली हजर राहण्यास फर्मावणाऱ्या कोणत्याही आदेशास लागू होईल.

(४) उपरोक्त प्रमाणे असलेले असे प्रत्येक अन्वेषण किंवा कार्यवाही ही भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) ची कलमे १९३ व २२८ यांच्या अर्थान्तगत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

**दस्तऐवज, इत्यादीची अभिरक्षा**

४१. ज्यावेळी कलम ३३ च्या पोट कलम (२), अन्वये देण्यात आलेल्या एखाद्या आदेशाच्या किंवा कलम ३४ किंवा कलम ३६ किंवा कलम ३७ याच्या उपबंधाच्या अनुषंगाने किंवा कलम ३९ किंवा कलम ४० च्या अन्वये एखाद्या फर्मानाच्या किंवा समन्सच्या अनुषंगाने कोणतीही दस्तऐवज प्रस्तुत करण्यात आला असेल किंवा जप्त करण्यात आला असेल आणि कोणत्याही बजावणी अधिकाऱ्यास असे वाटण्यास कारण असेल की, उक्त दस्तऐवज हा या अधिनियमांच्या उपबंधापैकी कोणतीही उपबंध किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश यांच्या व्यतिक्रमणाचा एक पुरावा होईल, आणि तो दस्तऐवज आपल्या अभिरक्षेत ठेवून घेणे आवश्यक आहे, तर त्यास, उक्त दस्तऐवज जास्तीत जास्त [1][सहा महिन्यांच्या] मुदतीसाठी किंवा [1][सहा महिन्याची] मुदत संपण्यापूर्वी,—

(एक) कलम ५१ अन्वये कोणत्याही कार्यवाहीस प्रारंभ झाला असेल यात अपील मंडळ आणि उच्च न्यायालय यांच्या समोरील कार्यवाही, कोणतीही असल्यास तिचाही समावेश आहे. तर अशी कार्यवाही निकालात निघेपर्यंत, किंवा

(दोन) कलम ५६ अन्वये एखाद्या न्यायालयासमोर कोणत्याही कार्यवाहीस प्रारंभ झाला असेल तर, तो दस्तऐवज न्यायालयाच्या दप्तरीदाखल असे पर्यंत अशारीतीने स्वतःकडे ठेवून घेता येईल :

[2][परंतु असे की, सक्तवसुली संचालकाकडून पूर्वोक्त सहा महिन्याचा कालावधी, आणखी सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीकरिता वाढवून दिला जाईल आणि त्याची कारणे लेखी नमूद करण्यात येतील.]

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही प्रकरणात, या कलमान्वये एखादा दस्तऐवज (ज्याचा या स्पष्टीकरणात यापुढे "उक्त दस्तऐवज" असा निर्देश करण्यात आला आहे.) ज्या कालावधीत स्वतःकडे ठेवून घेता येईल त्या [3] * * * * कालावधीची गणना करताना, ज्या कोणत्याही प्रकरणात एखाद्या न्यायालयाच्या व्यादेशामुळे किंवा त्याच्या आदेशामुळे (मग असा व्यादेश किंवा आदेश उक्त दस्तऐवजाच्या संबंधात असो किंवा उक्त दस्तऐवजाच्या तपासणीकरिता किंवा त्याचा वापर करण्याकरिता ज्याचा संदर्भ पाहणे आवश्यक आहे अशा इतर कोणत्याही दस्तऐवजाच्या संबंधात असो),—

(क) या अधिनियमाच्या उपबंधापैकी कोणताही उपबंध किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश यांच्या व्यतिक्रमणाचा उक्त दस्तऐवज पुरावा होईल किंवा काय, ते निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ, त्याची संपूर्ण तपासणी करता आली नसेल, किंवा

(ख) कलम ५१ किंवा कलम ५६ अन्वये कोणत्याही कार्यवाहीस प्रारंभ करण्यासाठी उक्त दस्तऐवजाचा वापर करता आला नसेल, किंवा

(ग) कलम ५१ किंवा कलम ५६ अन्वये कार्यवाहीस प्रारंभ करता आला नसेल तर त्या प्रकरणी, तो व्यादेश किंवा आदेश चालू राहण्याचा कालावधी ज्या दिवशी जारी करण्यात किंवा देण्यात आला तो दिवस आणि ज्या दिवशी तो मागे घेण्यात आला तो दिवस, वगळण्यात येईल.

**धनादेश, धनाकर्ष इत्यादी वटवणे.**

४२. (१) **ज्यावेळी,—**

(एक) कलम १३ किंवा कलम १ च्या पोटकलम (१) चा खंड (क्) किंवा कलम १८, [4][कलम १८ क] च्या पोटकलम (१) चा खंड (क्) आणि कलम ६७ यांच्या उपबंधांच्या कोणत्याही अभिकथित व्यतिक्रमणाबाबत अन्वेषण करण्यात येत असेल, किंवा

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २१ (क्) द्वारे दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २१ (ख्) द्वारे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २१ (ग्) द्वारे वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम २२ (क्) द्वारे दाखल केले.

(दोन) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधांच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही अभिकथित व्यतिक्रमणाबाबत अन्वेषण करण्यात येत असेल, किंवा

(तीन) खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या अशा कोणत्याही व्यतिक्रमणाच्या संबंधातील कोणतीही कार्यवाही, एखाद्या सीमाशुल्क अधिकाऱ्यापुढे किंवा एखाद्या सक्त वसुली अधिकाऱ्यापुढे किंवा एखाद्या न्यायालयापुढे प्रलंबित असेल आणि अशा अन्वेषणाचा किंवा कार्यवाहीचा विषय असणारा कोणताही धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख एखाद्या सीमाशुल्क अधिकाऱ्याच्या किंवा एखाद्या सक्तवसुली अधिकाऱ्याच्या किंवा एखाद्या न्यायालयाच्या अभिरक्षेत असेल त्यावेळी,—

(क) असा धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख एखाद्या सीमाशुल्क अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असेल त्याबाबतीत सीमाशुल्क समाहारकास, किंवा

(ख) असा धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख एखाद्या सक्तवसुली अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असेल त्याबाबतीत सक्तवसुली संचालकास, किंवा

(ग) असा धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख एखाद्या न्यायालयाच्या अभिरक्षेत असेल त्याबाबतीत, सीमाशुल्क समाहारकाने किंवा, प्रकरणपरत्वे, सक्तवसुली संचालकाने याबाबतीत न्यायालयाकडे अर्ज केल्यावर, त्या न्यायालयास,

आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, असा धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख यामधील देय रक्कम ही एकतर रिझर्व्ह बँकेमधून किंवा, प्रकरणपरत्वे, सीमाशुल्क समाहारक किंवा सक्तवसुली संचालक किंवा न्यायालय, यांस योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही अभिकरणामार्फत वटवण्यात यावी.

(२) पोट कलम (१) खालील निदेशास अनुसरून वसूल करण्यात आलेले कोणतेही उत्पन्न विहित प्राधिकाऱ्याकडून विहित रीतीने ठेवण्यात यावयाच्या एका वेगळ्या लेख्यात ठेवण्यात येईल.

(३) ज्यावेळी पोट कलम (१) अन्वये ज्याचे उत्पन्न वसूल करण्यात आले आहे असा कोणताही धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख अधिकृत करण्याबाबत कलम ६३ अन्वये एखादा निदेश देण्यात आला असेल किंवा सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) अन्वये एखादा आदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत, असे उत्पन्न केंद्र सरकारकडे निहित होईल आणि इतर सर्व प्रकरणांमध्ये असे उत्पन्न, पोट कलम (१) अन्वये ज्या अधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने निदेश दिला असेल त्या अधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला, असा धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख ज्या तारखेस त्याच्या अभिरक्षेत आला असेल त्या तारखेपासून प्रदानाच्या तारखेपर्यंत दरसाल सहा टक्के दराच्या व्याजासह न्याय्य वाटेल अशा चलनात आणि अशा रीतीने ज्या व्यक्तीस ते मिळण्याचा हक्क आहे, असे वाटेल, तिला देण्यात येईल :

परंतु, संपूर्ण उत्पन्न किंवा त्याचा कोणताही भाग जिला मिळेल अशा कोणत्याही व्यक्तीने त्यासंबंधीचा कायदेशीर हक्क असलेल्या व्यक्तीला ते देण्याच्या तिच्या दायित्वावर या पोटकलमातील कशाचाही परिणाम होणार नाही.

[1][(४) जेव्हा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अन्वेषणाची किंवा कार्यवाहीची विषयवस्तू असलेले कोणतेही परकीय चलन सीमाशुल्क अधिकाऱ्याच्या किंवा सक्तवसुली अधिकाऱ्याच्या किंवा न्यायालयाच्या अभिरक्षेमध्ये असते तेव्हा, सीमाशुल्क [2][आयुक्त] सक्तवसुली संचालक किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायालयास तशा अभिरक्षेबाबत असलेली सुरक्षेची जोखीम लक्षात घेऊन त्यास योग्य वाटेल अशा रीतीने ते परकीय चलन बँकेमध्ये जमा करण्याचा निदेश देता येईल.

(५) जेव्हा पोट कलम (१) अन्वये धनाकर्ष, धनादेश (प्रवासी धनादेशासह) किंवा इतर संलेख वटवायचा असेल किंवा पोट कलम (४) अन्वये कोणतेही परकीय चलन बँकेत जमा करावयाचे असेल तेव्हा, सीमाशुल्क [2][आयुक्त] सक्तवसुली संचालक किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायालय, अशा धनाकर्षाची, धनादेशाची किंवा अन्य संलेखाची किंवा परकीय चलनाची वस्तुसूची तयार करील किंवा करण्याची व्यवस्था करील आणि त्यात त्या वस्तूचे वर्णन, चिन्ह, क्रमांक, मूळदेश हा तपशील आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत ती वस्तू ओळखण्यासाठी आवश्यक वाटेल असा अन्य कोणताही तपशील नमूद करील आणि जेव्हा वस्तुसूची [2][आयुक्ताने] किंवा संचालकाने तयार केलेली असेल तेव्हा [2][आयुक्त] किंवा, प्रकरणपरत्वे, संचालक पुढील प्रयोजनार्थ दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करील,—

(क) अशा रीतीने तयार केलेल्या वस्तुसूचीचा अचूकपणा प्रमाणित करणे ; किंवा

(ख) असा धनाकर्ष, धनादेश, इतर संलेख किंवा परकीय चलन यांचे दंडाधिकाऱ्यासमक्ष छायाचित्र घेणे, आणि असे छायाचित्र खरे असल्याचे प्रमाणित करणे.

(६) जेव्हा पोटकलम (५) अन्वये अर्ज केला असेल तेव्हा दंडाधिकारी, होईल, तितक्या लवकर तो अर्ज मान्य करील.]

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २२ द्वारे नवीन पोट कलमे समाविष्ट केली.

२. १९९५ चा अधिनियम २२ कलम ९१ द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

**निरीक्षण.**

४३. (१) सक्तवसुली संचालकाने याबाबतीत विशेषरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या सक्तवसुली सहायक संचालकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा कोणत्याही बजावणी अधिकाऱ्यास किंवा रिझर्व्ह बँकेने याबाबतीत विशेषरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या रिझर्व्ह बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही प्राधिकृत विक्रेत्याची पुस्तके व लेखे आणि इतर दस्तऐवज यांचे निरीक्षण करता येईल.

(२) आपल्या अभिरक्षेत किंवा शक्तीमध्ये बसतील अशी सर्व पुस्तके, लेखे व इतर दस्तऐवज, पोटकलम (१) अन्वये निरीक्षण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यापुढे प्रस्तुत करणे आणि उक्त अधिकारी त्यास फर्मावील असे कोणतेही निवेदन करणे किंवा प्राधिकृत विक्रेत्याच्या व्यवहाराशी संबंधित माहिती, तो अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत देणे, हे प्रत्येक प्राधिकृत विक्रेत्याचे आणि प्राधिकृत विक्रेता एखादी कंपनी किंवा पेढी असेल त्याबाबतीत, त्या प्राधिकृत विक्रेत्याच्या प्रत्येक संचालकाचे, भागीदाराचे किंवा प्राधिकृत विक्रेत्याच्या इतर अधिकाऱ्यांचे, कर्तव्य असेल.

(३) पोटकलम (१) अन्वये निरीक्षण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही प्राधिकृत विक्रेत्याची किंवा त्याच्या अभिकर्त्याची किंवा प्राधिकृत विक्रेता हा एखादी कंपनी किंवा एखादी पेढी असेल त्याबाबतीत, त्याच्या कामधंद्याबाबत कोणत्याही संचालकाची, भागीदाराची किंवा प्राधिकृत विक्रेत्याच्या इतर अधिकाऱ्यांची शपथेवर तपासणी करता येईल.

(४) जे प्रस्तुत करणे किंवा पुरविणे हे पोट कलम (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीचे कर्तव्य आहे असे कोणतेही पुस्तक, लेखा किंवा इतर दस्तऐवज दाखल करण्यात किंवा प्राधिकृत विक्रेत्यांच्या संबंधात कोणतेही निवेदन करण्यात किंवा माहिती पुरविण्यात किंवा या कलमाखाली निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्याकडून प्राधिकृत विक्रेत्याच्या कामधंद्यासंबंधात तिला विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर देण्यात, कोणत्याही व्यक्तीने कसूर केली तर, तिने या अधिनियमाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण केले असल्याचे मानण्यात येईल.

(५) या कलमांचे उपबंध प्राधिकृत विक्रेत्याच्या संबंधात जसे लागू होतात तसेच ते शक्य तेथवर, एखाद्या नाणेवटीच्या [1] * * * * * अशा व्यक्तीच्या संबंधातही लागू होतील.

**विवक्षित प्रकरणांखेरीज दस्तऐवज किंवा माहिती उघड करण्यास प्रतिषेध.**

४४. (१) बजावणी संचालकाचे किंवा सहायक बजावणी संचालकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा अन्य कोणत्याही बजावणी अधिकाऱ्याचे जर असे मत असेल की, या अधिनियमाखालील कोणत्याही अन्वेषणाच्या किंवा कार्यवाहीच्या ओघात त्याच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली आलेल्या दस्तऐवजांमध्ये अंतर्भूत असलेल्या गोष्टी या, त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली चालू असलेल्या किंवा सुरू करण्यात येईल अशा कार्यवाहीसाठी उपयुक्त किंवा संबद्ध ठरतील तर, त्याला अशा अन्य कायद्याने किंवा तदन्वये, यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडे त्यास योग्य वाटेल असा दस्तऐवज किंवा त्यात अंतर्भूत असलेली कोणतीही माहिती उघड करता येईल.

(२) कोणताही अंमलबजावणी अधिकारी, पोट कलम (१) ला अनुसरून किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही फर्मानास अनुसरून असा अधिकारी म्हणून सद्‌भावपूर्वक आपले कर्तव्यपालन करत असताना असेल त्या व्यतिरिक्त, त्यांच्या पदीय नात्याने त्यास मिळालेल्या कोणताही दस्तऐवज किंवा कोणतीही माहिती उघड करील तर, त्यास सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

**पोलीस अधिकाऱ्यांची आणि इतर अधिकाऱ्यांची प्रवेश करणे, झडती घेणे इत्यादींची शक्ती.**

४५. (१) [2][फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असेल तरी पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही पोलीस अधिकारी] किंवा केंद्र सरकारचा किंवा केंद्र सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेला राज्य शासनाचा इतर कोणताही अधिकारी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करू शकेल आणि तेथे झडती घेवू शकेल आणि कलम ८ च्या पोटकलम (१) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण केले असल्याचा किंवा व्यतिक्रमण करीत असल्याचा किंवा व्यतिक्रमण करण्याच्या बेतात असल्याचा जिच्यासंबंधात रास्त संशय आहे अशा, तेथे आढळणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस वॉरंटशिवाय अटक करू शकेल.

**स्पष्टीकरण**.—या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी "सार्वजनिक ठिकाण" या शब्दप्रयोगात कोणतेही सार्वजनिक वाहन, कोणतेही हॉटेल, कोणतेही दुकान किंवा जे लोकांच्या उपयोगासाठी आहे किंवा जेथे लोकांना जाता येते असे इतर कोणतेही ठिकाण, यांचा समावेश आहे.

(२) पोलीस अधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर एखाद्या अधिकाऱ्याने पोटकलम (१) अन्वये, कोणत्याही व्यक्तीस अटक केली असेल त्याबाबतीत असा अधिकारी, अटक केलेल्या व्यक्तीस अनावश्यक विलंबाशिवाय त्या प्रकरणी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्यापुढे किंवा एखाद्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यापुढे घेवून जाईल किंवा पाठवील.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २३ द्वारे वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २४ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले.

(३) या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, [1][फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २)] चे उपबंध, या कलमाखाली कोणत्याही ठिकाणी प्रवेश करणे किंवा तेथे झडती घेणे किंवा अटक करणे यासंबंधात शक्य तेथवर लागू होतील.

(४) या कलमाचे उपबंध, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही उपबंधामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट त्यांच्याशी विसंगत असली तरीही, परिणामकारक असतील.

पोलीस अधिकाऱ्यांनी जप्त केलेले परकीय चलन किंवा इतर कोणत्याही वस्तू यासंबंधीची कार्यपद्धती.

४६. (१) ज्यावेळी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने, ज्यांची चोरी करण्यात आली आहे असे अभिकथित असेल किंवा असा संशय असेल किंवा वरीलपैकी कोणत्याही प्रकरणात या अधिनियमाखालील अपराध घडला असल्याचा संशय उत्पन्न करणाऱ्या परिस्थितीत सापडलेले कोणतेही परकीय चलन किंवा इतर माल जप्त केला असेल त्याबाबतीत असा पोलीस अधिकारी,—

(एक) अशा परकीय चलनाच्या जप्तीसंबंधात सहायक बजावणी संचालकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा निकटतम बजावणी अधिकाऱ्यास ; आणि

(दोन) अशा इतर वस्तूंच्या जप्तीसंबंधात सहायक सीमाशुल्क [2][आयुक्ताच्या] दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा निकटतम सीमाशुल्क अधिकाऱ्यास ताबडतोब कळवील.

(२) [3][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] यात काहीही अंतर्भूत असले तरी- पोलीस अधिकारी, तक्रार खारीज करण्यात आल्यानंतर किंवा चौकशी किंवा प्रकरणपरत्वे, संपरीक्षा, संपल्यानंतर,—

(एक) सहायक बजावणी संचालकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा बजावणी अधिकाऱ्यांकडे असे परकीय चलन देण्याची ; आणि

(दोन) सहायक सीमाशुल्क [2][आयुक्ताच्या] दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा सीमाशुल्क अधिकाऱ्याकडे अशा इतर वस्तू पाठवण्याची व्यवस्था करील.

अधिनियम चुकविणाऱ्या संविदा.

४७. (१) या अधिनियमाचा कोणताही उपबंध किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश यांचे प्रवर्तन कोणत्याही प्रकारे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, ज्यामुळे चुकविता येईल किंवा टाळता येईल अशी कोणतीही संविदा किंवा करार कोणतीही व्यक्ती करणार नाही.

(२) केंद्र सरकारच्या किंवा रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय एखादी गोष्ट करण्यात येणार नाही, अशा या अधिनियमामधील किंवा तदन्वये प्रभावी असलेल्या कोणत्याही उपबंधामुळे, ती गोष्ट करण्या-बद्दल एखाद्या व्यक्तीकडून करण्यात आलेला करारनामा, जर त्या करारनाम्यात अशी अट घालण्यात आलेली असेल की, जोवर केंद्र सरकारने किंवा प्रकरणपरत्वे, रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली नसेल तोवर ती गोष्ट करण्यात येणार नाही तर, विधिबाह्य ठरणार नाही, आणि भारताच्या कोणत्याही भागामधील कायद्याद्वारे शासित प्रत्येक संविदेमध्ये ही उपलक्षित अट असेल की, जर त्या संविदेतील कोणत्याही अटी-द्वारे अशी एखादी गोष्ट करण्याचा करार करण्यात आला असेल की, जी केंद्र सरकारच्या किंवा रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय करण्यास या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा त्यानुसार प्रतिषेध करण्यात आला आहे, तर ती गोष्ट अशी परवानगी दिली जाईपर्यंत करण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमाचे उपबंध किंवा उक्त उपबंधाद्वारे ज्याकरिता केंद्र सरकारची किंवा रिझर्व्ह बँकेची परवानगी घेणे आवश्यक आहे, अशी कोणतीही गोष्ट त्या परवानगी शिवाय करण्यात येणार नाही, यासंबंधीच्या कोणत्याही करारात अंतर्भूत असलेली, कोणतीही अट (मग ती स्पष्ट असो किंवा उपलक्षित असो) यामुळे, उक्त उपबंध आणि अशी अट यांव्यतिरिक्त जी देय होईल, अशी कोणतीही रक्कम मग ती कर्जाची असो, भरपाईची असो किंवा अन्य कोणतीही असो—वसूल करण्यासाठी भारतात वैध कार्य-वाही करण्यास प्रतिबंध होणार नाही, मात्र—

(क) उक्त उपबंध हे जसे इतर रकमांच्या संबंधात लागू होतात तसेच ते, कोणत्याही न्यायालयाच्या कोणताही न्यायनिर्णय किंवा आदेश याद्वारे देणे आवश्यक असलेल्या रकमांना लागू होतील;

(ख) जिला उक्त उपबंध लागू होतात अशा कोणत्याही रकमेच्या प्रदानासंबंधीच्या कोणत्याही न्यायनिर्णयांची किंवा आदेशांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणतीही उपाययोजना करण्यात येणार नाही, मात्र त्या रकमेपैकी जेवढ्या भागाचे प्रदान करण्यास केंद्र सरकारने, किंवा, प्रकरणपरत्वे, रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली असेल, त्या भागाबाबत अशी उपाययोजना करता येईल ;

(ग) अशी परवानगी द्यावी किंवा देऊ नये याबाबत विचार करण्याच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकार, किंवा, प्रकरणपरत्वे, रिझर्व्ह बँक न्यायनिर्णयाचा किंवा आदेशाचा फायदा मिळण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्तीस आणि न्यायनिर्णय व आदेश यांमधील ऋणकोस, त्या फर्मानात विनिर्दिष्ट करण्यात येईल असे दस्तऐवज दाखल करण्यास आणि अशी माहिती देण्यास फर्मावू शकेल.

(४) परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाचे किंवा तदन्वये करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश याचे उपबंध

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २४ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. १९९५ चा अधिनियम २२ कलम ९१ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
३. १९९३ चा अधिनियम २९, कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

किंवा ते उपबंध लक्षात घेता या अधिनियमान्वये परवानगीशिवाय कोणतेही प्रदान देण्यात येणार नाही, अशी कोणतीही शर्त, मग ती स्पष्ट असो किंवा उपलक्षित असो—यामुळे कोणताही संलेख, विपत्र किंवा वचनपत्र बनण्यास प्रतिबंध होत असल्याचे मानण्यात येणार नाही.

खोटी कथने.

४८. कोणतीही व्यक्ती, कलम ३३ खालील कोणत्याही निदेशाचे किंवा आदेशाचे किंवा कलम ४३ खालील कोणत्याही फर्मानाचे पालन करताना किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे कोणताही अर्ज करताना किंवा कोणतीही घोषणा करताना, जे कोणत्याही महत्त्वाच्या बाबींसंबंधात खोटे असल्याचे किंवा खरे नसल्याचे तिला माहीत असेल किंवा तिला तसे वाटण्यास वाजवी कारण असेल, अशी कोणतीही माहिती देणार नाही किंवा कोणतेही निवेदन करणार नाही.

या अधिनियमाखालील परवानगी किंवा लायसने ज्या शर्तींच्या अधीन राहून देण्यात आली असतील, त्या शर्तींचे पालन करण्यातील कसुरी ही अधिनियमाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण असेल.

४९. ज्यावेळी या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये कोणतीही परवानगी किंवा लायसन कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही शर्तींना अधीन राहून देण्यात किंवा मंजूर करण्यात आले असेल आणि अशा व्यक्तीने,

(एक) अशा व्यक्तीने अशा सर्व किंवा कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल;

(दोन) अशा सर्व किंवा कोणत्याही शर्तींचे पालन न करण्यास कोणत्याही अन्य व्यक्तीने, अशा व्यक्तीस अपप्रेरणा दिली असेल तर या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी :—

(क) खंड (एक) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या प्रकरणात अशा व्यक्तीने अशा उपबंधाचे व्यतिक्रमण केले असल्याचे मानण्यात येईल; आणि

(ख) खंड (दोन) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या प्रकरणात, अशा अन्य व्यक्तीने अशा उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यास अपप्रेरणा दिली असल्याचे मानण्यात येईल.

शास्ती.

५०. कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या [कलम १३, [1][कलम १८, कलम १८क] च्या पोटकलम (१) च्या खंड (क) आणि कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क) यांच्या व्यतिरिक्त इतर] किंवा तदन्वये करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश यांच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले तर ती सक्तवसुली संचालकाकडून किंवा केंद्र सरकारच्या (ज्याचा यात यापुढे कोणत्याही प्रकरणात "अभिनिर्णेता अधिकारी" असा निर्देश करण्यात आला आहे) आदेशाद्वारे त्याबाबतीत विशेष रीत्या शक्ती प्रदान करण्यात आलेल्या सक्तवसुली सहायक संचालकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा अन्य कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्याकडून न्यायनिर्णीत करण्यात येईल अशा, कोणत्याही व्यतिक्रमणात अंतर्भूत रकमेच्या किंवा मूल्यांच्या पाच पट किंवा पाच हजार रुपये यांपैकी जास्त असेल त्या रकमेपेक्षा अधिक नसेल अशा शास्तीस पात्र होईल.

अभिनिर्णय करण्याची शक्ती.

५१. कलम ५० अन्वये न्यायनिर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा तदन्वये करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश याच्या कोणत्याही उपबंधाचे (त्या कलमात निर्देश करण्यात आलेल्या उपबंधाव्यतिरिक्त) व्यतिक्रमण केले आहे किंवा कसे यासंबंधात अभिनिर्णेता अधिकारी, त्या व्यक्तीस त्या बाबींसंबंधात अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, विहित रीतीने चौकशी करील आणि अशा चौकशीनंतर, जर त्या व्यक्तीने व्यतिक्रमण केले आहे अशी त्याची खात्री पटली तर तो, त्या कलमाच्या उपबंधास अनुसरून तिच्यावर त्यास योग्य वाटेल अशी शास्ती लादू शकेल.

अपील मंडळाकडे अपील.

५२. (१) अभिनिर्णेता अधिकाऱ्याने कलम ५१ अन्वये दिलेल्या आदेशांवरील अपिलांच्या सुनावणीसाठी केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एक अपील मंडळ घटित करू शकेल, त्यास परकीय चलन विनियमन अपील मंडळ असे म्हणता येईल. त्यावर एक अध्यक्ष [जिने किमान दहा वर्षे एखादे दिवाणी न्यायिक पद धारण केले आहे किंवा जी किमान तीन वर्षे केंद्रीय विधि सेवेची सदस्य राहिली आहे (श्रेणी १ पेक्षा खाली नव्हे) किंवा जिने अधिवक्ता म्हणून किमान दहा वर्षे व्यवसाय केला आहे, अशी व्यक्ती] आणि केंद्र सरकारने नेमावयाचे जास्तीत जास्त चार इतर सदस्य असतील.

(२) अशा आदेशाद्वारे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, [2][विहित करण्यात येईल अशी फी भरल्यावर आणि] व्यतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर ज्या तारखेस आदेश बजावण्यात आला असेल त्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांच्या आत आणि कलम ५० अन्वये शास्तीच्या रूपात लादलेली रक्कम जमा केल्यानंतर अपील मंडळाकडे अपील करता येईल :

परंतु, अपिलदारास वेळेवर अपील करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला अशी अपील मंडळाची खात्री पटल्यास, त्यास उक्त पंचेचाळीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, मात्र पूर्वोक्त तारखेनंतर नव्वद दिवसांनंतर नव्हे, कोणतेही अपील स्वीकारता येईल :

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २५ द्वारे दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २६ (क) द्वारे नवीन मजकर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, आणखी असे की, रक्कम जमा करण्यामुळे अपिलदारास गैरवाजवी हालअपेष्टा भोगाव्या लागतील असे अपील मंडळाचे मत असले तर त्यास स्वविवेकानुसार, एकतर बिनशर्त किंवा त्यास योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन राहून, अशा प्रकारे रक्कम जमा करणे अनावश्यक ठरवता येईल.

(३) पोटकलम (२) खालील अपील प्राप्त झाल्यानंतर अपील मंडळ, त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यावर, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे तो आदेश कायम करू शकेल, त्यात फेरबदल करु शकेल किंवा तो रद्द करू शकेल आणि कलम ५४ च्या उपबंधास अधीन राहून अपील मंडळाचा निर्णय अंतिम असेल आणि पोटकलम (२) अन्वये शास्तीच्या रूपात जमा करण्यात आलेली रक्कम, अपील मंडळाने जी रक्कम देण्याचा निदेश दिला असेल त्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, तेवढी अधिक रक्कम परत देण्यात येईल.

(४) अपील मंडळ, कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात, कलम ५० आणि कलम ५१ अन्वये अभिनिर्णेता अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाची वैधता, औचित्य किंवा अचूकपणा तपासून पाहण्याच्या प्रयोजनार्थ स्वतःहून किंवा अन्यथा अशा कार्यवाहीसंबंधीचे अभिलेख मागवू शकेल आणि त्या प्रकरणी त्यास योग्य वाटेल, असा आदेश देऊ शकेल.

(५) अभिनिर्णेता अधिकाऱ्याने कलम ५० आणि कलम ५१ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशात त्या बाबींसंबंधात अभिवेदन करण्याची वाजवी संधी कोणत्याही व्यक्तीस न देता तिच्यावर बाधक परिणाम होईल असा बदल अपील मंडळ करू शकणार नाही आणि यास अधीन राहून, अपील मंडळ आपल्या-पुढील कार्यवाही संबंधात विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील.

(६) दोन सदस्यांनी मिळून बनलेल्या आणि अपील मंडळाच्या अध्यक्षाद्वारे घटित न्यायपीठाला अपील मंडळाच्या शक्ती वापरता येतील आणि त्यांची कामे पार पाडता येतील :

परंतु, कोणत्याही एका किंवा अनेक मुद्यांवर न्यायमंडळाच्या सदस्यांमध्ये मतभेद असेल तर ते ज्या एका किंवा अनेक मुद्यांसंबंधी मतभेद असतील ते मुद्दे नमूद करतील आणि अशा मुद्याच्या किंवा मुद्यांच्या सुनावणीसाठी (अध्यक्षाने विनिर्दिष्ट करावयाच्या तिसऱ्या सदस्याकडे) निर्देशित करतील आणि त्या सदस्याच्या मतानुसार त्या मुद्यासंबंधी किंवा मुद्यांसंबंधी निर्णय घेण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, अपील मंडळाचा अध्यक्ष किंवा त्याबाबतीत अध्यक्षाने प्राधिकृत केलेला अपील मंडळाचा अन्य कोणताही सदस्य [1][दोन लाख पन्नास हजार रुपयांपेक्षा] अधिक नसलेल्या रकमेची शास्ती लादणाऱ्या आदेशाविरुद्ध कोणत्याही अपिलासंबंधात अपील मंडळाच्या शक्तींचा वापर करण्यास आणि त्याची कामे पार पाडण्यास सक्षम असेल.

**अभिनिर्णेता अधिकाऱ्यांच्या व अपील मंडळाच्या साक्षीदारांना समन्स पाठविणे इत्यादी संबंधीच्या शक्ती.**

५३. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या इतर कोणत्याही उपबंधास बाध न आणता, पुढील बाबींसंबंधात एखाद्या दाव्याची संपरीक्षा करताना, अभिनिर्णेता अधिकाऱ्यास आणि अपील मंडळास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दिवाणी न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील त्या अशा,—

(क) साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठविणे व त्याची अंमलबजावणी करणे;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो दाखल करण्यास फर्माविणे;

(ग) कोणत्याही न्यायालयातील किंवा कार्यालयातील कोणत्याही सार्वजनिक अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे;

(घ) शपथपत्रांवर पुरावा घेणे; आणि

(ङ) साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही शक्तीचा वापर करताना अभिनिर्णेता अधिकाऱ्यास किंवा अपील मंडळास, [2][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याची कलमे ३४५ व ३४६] यांच्या प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालय मानण्यात येईल.

**उच्च न्यायालयाकडे अपील.**

५४. कलम ५२ च्या पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) अन्वये अपील मंडळाच्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध केवळ कायदा विषयक प्रश्नावर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल :

परंतु, अपिलदारास वेळेवर अपील दाखल करण्यास पुरेशा कारणांमुळे प्रतिबंध झाला अशी उच्च न्यायालयाची खात्री पटली असल्याशिवाय, अपील मंडळाचा निर्णय किंवा आदेश कळवण्यात आल्याच्या तारखेपासून साठ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर उच्च न्यायालय या कलमान्वये कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमात व कलम ५५ मध्ये "उच्च न्यायालय" याचा अर्थ,—

(एक) व्यथित पक्षकार सर्वसाधारणपणे ज्याच्या अधिकारितेत राहतो किंवा व्यवसाय करतो किंवा लाभासाठी व्यक्तिशः काम करतो ते उच्च न्यायालय असा आहे, आणि

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २६ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

(दोन) केंद्र सरकार व्यथित पक्षकार असेल त्या बाबतीत, ज्या उच्च न्यायालयाच्या अधिकारितेत उत्तरवादी किंवा एकाहून अधिक उत्तरवादी असतील त्या बाबतीत त्यापैकी कोणताही उत्तरवादी सर्वसाधारणपणे ज्याच्या अधिकारितेत राहत असेल किंवा व्यवसाय करीत असेल किंवा लाभासाठी व्यक्तिशः काम करीत असेल, ते उच्च न्यायालय असा, आहे.

५५. (१) ज्यावेळी,—

(एक) अभिनिर्णेता अधिकाऱ्याने कोणत्याही व्यक्तीवर कलम ५० आणि कलम ५१ अन्वये एखादी शास्ती लादली असेल आणि अशी शास्ती लादणाऱ्या आदेशाविरूद्ध अपील मंडळाकडे कोणतेही अपील करण्यात आले नसेल; किंवा मृत्यू किंवा नादारीच्या प्रसंगी कार्यवाही चालू राहणे.

(दोन) अपील मंडळाकडे असे कोणतेही अपील करण्यात आले असेल; आणि—

(क्) खंड (एक) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या प्रकरणात अपील मंडळाकडे अपील करण्यापूर्वी अशी व्यक्ती मृत्यू पावेल किंवा ती नादार म्हणून अभिनिर्णीत होईल, किंवा

(ख्) खंड (दोन) मध्ये, निर्देश करण्यात आलेल्या प्रकरणात अशी व्यक्ती, अपील प्रलंबित असताना मृत्यू पावेल, किंवा ती नादार म्हणून अभिनिर्णीत होईल,

त्यावेळी अशा व्यक्तीच्या वैध प्रतिनिधींनी किंवा, प्रकरणपरत्वे, शासकीय अभिहस्तांकितीने किंवा शासकीय प्रापकाने अपील मंडळाकडे अपील करणे किंवा, प्रकरणपरत्वे, अशा व्यक्तीऐवजी अपील मंडळापुढील अपील चालू ठेवणे कायदेशीर असेल आणि कलम ५२ चे उपबंध शक्य तेथवर अशा अपिलास लागू होतील किंवा लागू असण्याचे चालू राहतील.

(२) ज्यावेळी—

(एक) अपील मंडळाने निर्णय किंवा आदेश दिल्यानंतर, कलम ५४ अन्वये उच्च न्यायालयाकडे कोणतेही अपील करण्यात आले नसेल, किंवा

(दोन) उच्च न्यायालयाकडे असे कोणतेही अपील करण्यात आले असेल, आणि—

(क्) खंड (एक) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या प्रकरणात, उच्च न्यायालयाकडे अपील करण्यापूर्वी, अपील करण्याचा हक्क असलेली व्यक्ती मृत्यू पावेल किंवा ती नादार म्हणून अभिनिर्णीत होईल, किंवा

(ख्) खंड (दोन) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या प्रकरणात अपील उच्च न्यायालयापुढे प्रलंबित असताना, जिने अपील केले ती व्यक्ती मृत्यू पावेल किंवा ती नादार म्हणून अभिनिर्णीत होईल त्यावेळी अशा व्यक्तीच्या वैध प्रतिनिधींनी किंवा शासकीय अभिहस्तांकितीने किंवा शासकीय प्रापकाने उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करणे, किंवा, प्रकरणपरत्वे, अशा व्यक्तीच्या ऐवजी उच्च न्यायालयापुढील अपील चालू ठेवणे कायदेशीर असेल आणि कलम ५४ चे उपबंध शक्य तेथवर अशा अपीलास लागू होतील किंवा लागू असण्याचे चालू राहतील.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खालील शासकीय अभिहस्तांकिती किंवा शासकीय प्रापक यांच्याकडून त्यांच्या शक्तीचा वापर इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९ (१९०९ चा ५) किंवा, प्रकरणपरत्वे, प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० (१९२० चा ५) यांच्या उपबंधास अधीन राहून करण्यात येईल.

५६. (१) अभिनिर्णेता अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या शास्तीसंबंधीच्या कोणत्याही निवाड्यास बाध न आणता, जर कोणताही व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा तदन्वये करण्यात आलेला कोणताही नियम, [कलम १३, [1][कलम १८ कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क) कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क्) कलम ४४ चे पोटकलम (२) आणि कलमे ५७ व ५८ व्यतिरिक्त इतर] कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील, तर तिला न्यायालयाकडून दोषसिद्धीनंतर,— अपराध आणि खटले.

(एक) एक लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेचा किंवा मूल्याचा अंतर्भाव असलेल्या अपराधाच्या प्रकरणी सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल, परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल :

परंतु, न्यायनिर्णयात ज्यांचा उल्लेख करण्यात येईल अशा कोणत्याही पुरेशा आणि विशेष कारणांसाठी न्यायालयास, सहा महिन्यांपेक्षा कमी मुदतीची कारावासाची शिक्षा देता येईल.

(दोन) इतर कोणत्याही प्रकरणी तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २८ (क्) द्वारे दाखल केले.

(२) या अधिनियमाखालील [कलम १३ किंवा [1][कलम १८ किंवा कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा कलम ४४ चे पोट-कलम (२) किंवा कलम ५७ व कलम ५८ खालील अपराध नसेल अशा] अपराधासंबंधात कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखालील [कलम १३ किंवा [1][कलम १८ किंवा कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा [1][कलम १८ किंवा कलम १८क] चे पोटकलम (१) चा खंड (क) किंवा कलम ४४ चे पोटकलम (२) किंवा कलम ५७ किंवा कलम ५८ यांखालील अपराध नसेल अशी] अपराधासंबंधात पुन्हा सिद्धदोष ठरली असेल तर तिला दुसऱ्या आणि अशा नंतरच्या प्रत्येक अपराधा-बद्दल सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल, मात्र सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल:

परंतु, ज्यांचा न्यायनिर्णयात उल्लेख करण्यात येईल अशा कोणत्याही पुरेशा व विशेष कारणांसाठी न्यायालयास सहा महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या कारावासाची शिक्षा देता येईल.

(३) या अधिनियमाखालील [कलम १३ किंवा [1][कलम १८ किंवा कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा कलम ४४ चे पोटकलम (२) किंवा कलम ५७ किंवा कलम ५८ याखालील अपराध नसेल असा] अपराध केल्याचे जिच्या बाबतीत सिद्ध झाले आहे, अशा एखाद्या व्यक्तीविरुद्ध या अधिनियमाखालील [कलम १३ किंवा [1][कलम १८ किंवा कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क) किंवा ४४ चे पोटकलम (२) किंवा कलम ५७ किंवा कलम ५८ खालील अपराध नसेल असा] अपराध पुन्हा सिद्ध झाला असेल त्या बाबतीत, अशा व्यक्तीस ज्या न्यायालयाने सिद्धदोष ठरविले असेल त्यास, या कलमाखाली तिला देता येत असेल अशा कोणत्याही शिक्षेव्यतिरिक्त आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, त्या व्यक्तीने न्यायालयाकडून त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, तीन वर्षांपेक्षा अधिक नसणाऱ्या मुदतीसाठी न्यायालय विनिर्दिष्ट करील असा व्यवसाय, असा अपराध करणे ज्यामुळे सुकर होण्याची शक्यता आहे असा व्यवसाय करता कामा नये.

(४) पोटकलमे (१) व (२) यांच्या प्रयोजनासाठी सहा महिन्यांहून कमी मुदतीची कारा-वासाची शिक्षा देण्यासाठी, पुढील गोष्टी या पुरेशा व विशेष कारणे असल्याचे समजले जाणार नाही, त्या म्हणजे ---

(एक) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल आरोपीस प्रथमच सिद्धदोष ठरवण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती ;

(दोन) या अधिनियमाखालील अभियोगाहून अन्य अशा कोणत्याही कार्यवाहीत आरोपीला शास्ती भरण्याचा आदेश देण्यात आला आहे किंवा अशा कार्यवाहीशी संबंधित माल अधिकृत करण्याचा आदेश देण्यात आला आहे किंवा त्याच अपराधाबद्दल त्याच्याविरुद्ध अन्य कोणतीही शिक्षेची कार्यवाही करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती ;

(तीन) आरोपी हा मुख्य गुन्हेगार नव्हता आणि तो केवळ मालवाहक म्हणून काम करत होता किंवा अन्यथा गुन्हा करण्यात फक्त एक दुय्यम व्यक्ती होता ही वस्तुस्थिती ;

(चार) आरोपीचे वय.

(५) पोटकलमे (१) व (२) यांच्या प्रयोजनासाठी, ह्या अधिनियमाखालील अपराधांमुळे सर्वसामान्य जनतेचे किंवा कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही सारभूत नुकसान झालेले नाही, ही वस्तुस्थिती सहा महिन्यांहून कमी मुदतीच्या कारावासाची शिक्षा देण्यास पुरेसे व विशेष कारण होईल.

(६) [2][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १८८ च्या परंतुकातील] काहीही, या कलमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाला लागू होणार नाही.

**अभिनिर्णेता अधिकारी अपील मंडळ व उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशांच्या व्यतिक्रमणा-बद्दल शास्ती.**

५७. अभिनिर्णेता अधिकाऱ्याने किंवा अपील मंडळाने किंवा उच्च न्यायालयाने लादलेली शास्ती भरण्यास कोणत्याही व्यक्तीने कसूर केली तर किंवा तिने त्यांच्या कोणत्याही निदेशांचे किंवा आदेशांचे पालन करण्यास कसूर केली तर, तिला न्यायालयाद्वारे दोषसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

**सक्तवसुली अधि-काऱ्यांनी त्रास देण्याच्या हेतूने झडती इ. घेणे.**

५८. (१) या अधिनियमाखालील किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाखालील शक्ती वापरणारा कोणताही सक्तवसुली अधिकारी, जो,---

(क) संशयास कोणतेही वाजवी कारण नसताना कोणत्याही ठिकाणाची, जागेची, विमानाची, वाहनाची किंवा जलयानाची झडती घेतो किंवा झडती घेतली जाण्याची व्यवस्था करतो, किंवा

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २८ (ख) द्वारे दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २८ (ग) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

(ख) कोणत्याही व्यक्तीला त्रास देण्याच्या हेतूने स्थानबद्ध करतो किंवा तिची झडती घेतो किंवा तिला अटक करतो ;

त्याला, अशा प्रत्येक गुन्ह्याबद्दल, न्यायालयाद्वारे दोषसिद्धीनंतर [1][दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.]

(२) बुद्धिपुरस्सर व विद्वेषपूर्वक खोटी माहिती देणाऱ्या आणि त्याद्वारे या अधिनियमान्वये अटक करण्याची किंवा झडती घेण्याची व्यवस्था करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, न्यायालयाद्वारे दोषसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा [2][दहा हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

**गुन्हेगारीच्या मानसिक स्थितीची धारणा.**

५९. (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दलच्या ज्या अभियोगामध्ये आरोपीची गुन्हेगारीची मानसिक स्थिती असणे आवश्यक असेल, त्यावेळी न्यायालय अशी मानसिक स्थिती अस्तित्वात आहे असे गृहीत धरील, परंतु त्या अभियोगामध्ये अपराध म्हणून आरोप करण्यात आलेल्या कृतीच्यासबंधात त्याची तशी मानसिक स्थिती नव्हती, ही वस्तुस्थिती सिद्ध करणे हा आरोपीसाठी बचाव होईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "गुन्हेगारीची मानसिक स्थिती", यात एखाद्या वस्तुस्थितीचा उद्देश, हेतु व ज्ञान आणि एखाद्या वस्तुस्थितीमधील विश्वास किंवा त्यावर विश्वास ठेवण्याचे कारण यांचा समावेश आहे.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखादी वस्तुस्थिती अस्तित्वात आहे, याबद्दल कोणताही वाजवी, संशय न येता न्यायालयाची खात्री पटली असेल तेव्हाच फक्त ती सिद्ध झाली, असे म्हटले जाईल तिचे अस्तित्व संभवनीयतेच्या प्राबल्यामुळे सिद्ध होत असेल तेव्हा नव्हे.

(३) या कलमाचे उपबंध, या अधिनियमाखालील अपराधाबद्दलच्या कोणत्याही अभियोगाला जसे लागू होतात तसेच ते शक्य असेल तेथवर अधिनिर्णेता अधिकाऱ्यापुढील कोणत्याही कार्यवाहीला लागू होतील.

**अभियोगापासून उन्मुक्ती देण्याची शक्ती.**

६०. (१) केंद्र सरकारचे, जर असे मत असेल की, (अशा मताची कारणे लेखी नमूद करण्यात येतील) या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमागात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, जिचा संबंध आहे किंवा ती त्यात गुन्तगे सामील आहे, असे दिसत असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा पुरावा मिळवण्याच्या दृष्टीने, तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे तर, त्यास या अधिनियमाखालील किंवा भारतीय दंड संहितेखालील (१८६० चा ४५) किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमाखालील कोणत्याही अपराबद्दलच्या अभियोगापासून आणि या अधिनियमान्वये कोणतीही शास्ती लादण्यापासून देखील अशा व्यक्तीस या अटीवर उन्मुक्ती देता येईल की, ती अशा व्यतिक्रमणाशी संबंधित सर्व परिस्थिती संपूर्णपणे व खरीखुरी उघड करील.

(२) संबंधित व्यक्तीला दिलेली आणि त्याने स्वीकारलेली उन्मुक्ती ही, जेथवर त्या उन्मुक्तीचा विस्तार असेल तेथवर, ज्या अपराधाच्या संबंधात उन्मुक्ती देण्यात आली असेल, त्या बद्दलच्या अभियोगापासून किंवा या अधिनियमाखाली कोणतीही शास्ती लादण्यापासून, त्या व्यक्तीस उन्मुक्त ठेवील.

(३) केंद्र सरकारला जर असे दिसून येईल की, जिला या कलमान्वये उन्मुक्ती देण्यात आली आहे अशा कोणत्याही व्यक्तीने, ज्या शर्तीवर तिला उन्मुक्ती देण्यात आली आहे त्या शर्तीचे पालन केलेले नाही किंवा ती बुद्धिपुरस्सर काहीतरी लपवत आहे किंवा खोटा पुरावा देत आहे तर, केंद्र सरकारला तशा आशयाचा निष्कर्ष नोंदवता येईल आणि त्यानंतर ती उन्मुक्ती मागे घेतली असल्याचे मानण्यात येईल आणि तिला ज्या संबंधात उन्मुक्ती देण्यात आली होती त्या अपराधाबद्दल किंवा त्याच बाबींच्या संबंधात ती इतर ज्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी असल्याचे दिसून येत असेल, अशा अन्य कोणत्याही गुन्ह्याबद्दल अशा व्यक्तीची संपरीक्षा करता येईल आणि ती अन्यथा ज्यास पात्र ठरली असती अशी, या अधिनियमाखालील कोणतीही शास्ती लादण्यासही ती पात्र होईल.

**अपराधाची दखल.**

६१. [3][(१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याने आणि कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने कलम ५६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला तीन वर्षांहून अधिक मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांहून अधिक द्रव्यदंडाची शिक्षा देणे कायदेशीर असेल.]

(२) कोणतेही न्यायालय,—

(एक) कलम ४४ च्या पोटकलम (२) खालील किंवा कलम ५८ च्या पोटकलम (१) खालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची ;

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २९ (क) द्वारे दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २९ (ख) द्वारे दाखल केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे मूळ पोटकलमाऐवजी नवीन कलम दाखल केले.

(क) ज्यावेळी, सहायक सक्तवसुल अधिकाऱ्याहून कमी दर्जा नसलेल्या एखाद्या सक्तवसुली अधिकाऱ्याने, केंद्र सरकारच्या पूर्व मजुरीने असेल त्या खेरीज, गुन्हा केला असल्याचे अभिकथित असेल त्यावेळी, किंवा

(ख) ज्यावेळी, सहायक सक्तवसुली अधिकाऱ्याहून कमी दर्जा असलेल्या एखाद्या सक्तवसुली संचालकांच्या पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज गुन्हा केला असल्याचे अभिकथित असेल त्यावेळी, किंवा

(दोन) कलम ५६ किंवा कलम ५७ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची—

(क) सक्तवसुली संचालकाने, किंवा

(ख) सक्तवसुली संचालक किंवा केंद्र शासन यांनी याबाबत लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, किंवा

(ग) रिझर्व्ह बँकेकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या रिझर्व्ह बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने ;

लेखी तक्रार केली असल्याखेरीज दखल घेणार नाही :

परंतु, असे की, ज्यावेळी असा कोणताही अपराध हा, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या, अशा कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण असेल की, ज्याद्वारे एखादी गोष्ट परवानगीशिवाय करण्यात प्रतिषेध करण्यात आला असेल, त्यावेळी अपराधाचा आरोप करण्यात आलेल्या व्यक्तीला आपल्याला तशी परवानगी होती हे दर्शविण्याची संधी देण्यात आल्याशिवाय अशी कोणतीही तक्रार करण्यात येणार नाही.

विवक्षित गुन्हे बिनदखली असणे.

६२. कलम ४५ च्या उपबंधाच्या अधीनतेने, आणि [1][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कलम ५६ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा, त्या संहितेच्या अर्थांतर्गत बिनदखली असल्याचे मानण्यात येईल.

चलन, प्रतिभूती इ. चे अधिहरण.

६३. कलम ५६ खालील व्यतिक्रमणाची संपरीक्षा करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाला आणि कलम ५१ अन्वये न्यायनिर्णय करणाऱ्या कोणत्याही अभिनिर्णेता अधिकाऱ्याला, त्याला योग्य वाटेल तर, आणि अशा व्यतिक्रमणाबद्दल त्याला लादता येईल अशा कोणत्याही शिक्षेव्यतिरिक्त किंवा शास्ती-व्यतिरिक्त आणखी, असा निदेश देता येईल की, ज्याच्या संबंधात व्यतिक्रमण करण्यात आले आहे, असे कोणतेही चलन, प्रतिभूती किंवा अन्य कोणताही पैसा किंवा संपत्ती, केंद्र सरकारकडे अधिहृत करण्यात यावी आणि त्यास आणखी असाही निदेश देता येईल की, व्यतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे परकीय चलन-धारण किंवा त्याचा कोणताही भाग भारतात परत आणला जाईल किंवा याबाबत केलेल्या निदेशानुसार तो भारताबाहेर ठेवून घेण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, जिच्या संबंधात व्यतिक्रमण घडले आहे अशी संपत्ती—

(क) बँकेतील ठेवी, उक्त संपत्तीचे अशा ठेवींमध्ये रुपांतर केले असेल तेव्हा,

(ख) भारतीय चलन, उक्त संपत्तीचे त्या चलनात रुपांतर केलेले असेल तेव्हा,

(ग) त्या संपत्तीच्या रुपांतरणातून उद्‌भवली आहे, अशी अन्य कोणतीही संपत्ती,

यांचा समावेश आहे.

सिद्धता, प्रयत्न इत्यादी.

६४. (१) जो कोणी या अधिनियमाच्या [कलम १३, [2][कलम १८, कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क), कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क), कलम ४४ चे पोट-कलम (२) आणि कलमे ५७ व ५८ याहून अन्य] किंवा त्याखालील कोणत्याही नियमांच्या, निदेशांच्या किंवा आदेशांच्या कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमाणाची सद्धता करील आणि प्रकरणाच्या परि-स्थितीवरुन असे वाजवी अनुमान काढता येत असेल की, त्याच्या इच्छेवर अवलंबन नसलेल्या, परिस्थितीमुळे प्रतिबंध झाला नसता तर, पूर्वोक्तप्रमाणे व्यतिक्रमण घडले असते, तर त्याने कलम ५६ च्या प्रयोजनार्थ उपबंध, नियम, निदेश किंवा, प्रकरणपरत्वे, आदेश यांचे व्यतिक्रमण केले असल्याचे मानण्यात येईल.

(२) जो कोणी या अधिनियमाच्या [कलम १३ [2][कलम १८, कलम १८क] च्या पोटकलम (१) चा खंड (क) कलम १९ च्या पोटकलम (१) चा खंड (क), कलम ४४ चे पोटकलम (२) आणि कलमे ५७ व ५८ खेरीज इतर] किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्याचा प्रयत्न करील किंवा तसे करण्यास अपप्रेरणा देईल, त्याने त्या कलमाच्या प्रयोजनासाठी, त्या उपबंधाचे, नियमाचे, निदेशाचे किंवा, प्रकरणपरत्वे, आदेशाचे व्यतिक्रमण केले असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे दाखल केले.

लेखन दोष, इत्यादींची दुरुस्ती.

६५. अपील मंडळाने किंवा अभिनिर्णेता अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निर्णयातील किंवा आदेशातील लेखनदोष किंवा अंकगणितीय चूक अथवा त्यातील कोणतेही अभावित स्खलित किंवा अकृति यातून उद्भवलेल्या चुका अपील मंडळाकडून किंवा अभिनिर्णेता अधिकाऱ्याकडून किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या पदीय उत्तराधिकाऱ्याकडून कोणत्याही वेळी दुरुस्त केल्या जाऊ शकतील ;

परंतु असे की, या कलमाखाली करण्याचे योजलेल्या कोणत्याही दुरुस्तीचा कोणत्याही व्यक्तीवर बाधक परिणाम होणार असेल तर, अशी कोणतीही दुरुस्ती—

(१) अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा अवधी संपल्यानंतर, आणि

(२) त्याद्वारे परिणाम, होणाऱ्या व्यक्तीला त्याबाबतीत अभिवेदन करण्याची वाजवी संधी दिली गेल्याखेरीज, केली जाणार नाही.

[1][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६०] व अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ लागू होणे.

६६. (१) [1][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम ३६०] किंवा अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) यामध्ये अंतर्भूत असलेले काहीही या अधिनियमाखालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या व्यक्तीला लागू होणार नाही, मात्र ती व्यक्ती १८ वर्षे वयाखालील असेल तर ती गोष्ट अलाहिदा.

(२) कलम ५६ च्या पोट कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, पोट कलम (१) चे उपबंध परिणामक होतील.

सीमाशुल्क अधिनियम, १९६२ लागू होणे.

६७. कलम १३ [1][कलम १८, कलम १८क] च्या पोट कलम (१) चा खंड (क) आणि कलम १९ च्या पोट कलम (१) चा खंड (क) याद्वारे किंवा अन्वये लादण्यात आलेले कोणतेही निर्बंध हे सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याच्या कलम ११ अन्वये लादण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्या अधिनियमाचे सर्व उपबंध त्यानुसार परिणामक होतील.

कंपन्यांनी केलेले अपराध.

६८. (१) या अधिनियमाच्या अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करणारी व्यक्ती, ही एखादी कंपनी असेल तर, व्यतिक्रमण करण्यात आले त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज चालनाबद्दल तिची प्रभारी होती व तिला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही त्या व्यतिक्रमणाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा दिली जाण्यास त्या पात्र असतील:

परंतु असे की, या पोट कलमात अंतर्भूत असलेल्या कशामुळेही, असे व्यतिक्रमण आपल्या नकळत घडले किंवा अशा व्यतिक्रमणात प्रतिबंध करण्यासाठी आपण शक्य तेवढी वाजवी तत्परता दाखवली होती असे जर त्या व्यक्तीने सिद्ध केले तर,

अशी कोणतीही व्यक्ती शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कंपनीकडून या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यात आले असेल आणि असे सिद्ध झाले असेल की, कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा कंपनीच्या अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने ते करण्यात आले आहे अथवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा सुद्धा त्या व्यतिक्रमणाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे, आणि

(दोन) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

या अधिनियमाखाली सिद्धदोष ठरवण्यात आलेल्या कंपन्यांची नावे, कामधंद्याची ठिकाणे इ. प्रकाशित करण्याची न्यायालयाची शक्ती.

६९. (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणाबद्दल कोणत्याही कंपनीस या अधिनियमान्वये सिद्धदोष ठरवण्यात आले असेल त्यावेळी, त्या कंपनीला सिद्धदोष ठरवणाऱ्या न्यायालयाने त्या कंपनीचे नाव व तिचे कामधंद्याचे ठिकाण, व्यतिक्रमणाचे स्वरूप, कंपनीस अशा रीतीने सिद्धदोष ठरवण्यात आले आहे ही, वस्तुस्थिती आणि प्रकरणाच्या परिस्थितीत न्यायालयाला योग्य वाटेल असा अन्य तपशील, कंपनीच्या खर्चाने न्यायालय निदेशित करील अशा वर्तमानपत्रातून किंवा अशा रीतीने प्रकाशित करविण्याची व्यवस्था करणे सक्षम असेल.

(२) न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्याचा अवधी, कोणतेही अपील दाखल करण्यात न येता, समाप्त झालेला नसताना किंवा असे अपील, दाखल करण्यात आल्यानंतर ते निकालात काढण्यात आले नसताना पोटकलम (१) अन्वये कोणतेही प्रकाशन करण्यात येणार नाही.

(३) पोटकलम (१) खालील कोणत्याही प्रकाशनाचा खर्च हा जणू काय तो न्यायालयाने लादलेला द्रव्यदंड असल्याप्रमाणे कंपनीकडून वसूली योग्य असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता "कंपनी" याचा, कलम ६८ च्या स्पष्टीकरणाच्या खंड (एक) मध्ये जो अर्थ आहे, तोच अर्थ असेल.

**शासनाच्या येणे रकमांची वसुली.**

७०. (१) ज्यावेळी या अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीवर लादण्यात आलेली शास्ती भरण्यात आली नसेल त्यावेळी,—

(एक) अभिनिर्णेता अधिकारी, अशा प्रकारे येणे असलेली रक्कम, अशा व्यक्तीस देय असलेला जो पैसा कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्याच्या नियंत्रणाधीन असेल, त्यामधून कापून घेऊ शकेल ; किंवा

(दोन) अशा व्यक्तीचा जो कोणताही माल, कोणत्याही सक्तवसुली अधिकाऱ्याच्या नियंत्रणाधीन असेल, तो अटकावून ठेऊन किंवा विकून अशा प्रकारे येणे असलेली रक्कम अभिनिर्णेता अधिकारी वसूल करु शकेल ; किंवा

(तीन) खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने अशा व्यक्तीकडून ती रक्कम वसूल करता येत नसेल तर, अभिनिर्णेता अधिकारी अशा व्यक्तीकडून येणे असलेली रक्कम विनिर्दिष्ट केलेले स्वतःच्या स्वाक्षरीचे एक प्रमाणपत्र तयार करु शकेल आणि ते ज्या जिल्ह्यात अशा व्यक्तीची कोणतीही संपत्ती असेल किंवा ती राहत असेल किंवा कोणताही कामधंदा करीत असेल त्या जिल्ह्याच्या [१][आयुक्ताकडे] पाठवू शकेल ; आणि उक्त [आयुक्त] असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम ही जणू काय जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, उक्त व्यक्तीकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरू करील.

(२) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये निष्पादित केलेल्या कोणत्याही बंधपत्राच्या किंवा अन्य संलेखाच्या अटींमध्ये ज्यावेळी असे उपबंधित केलेले असेल की, अशा संलेखान्वये येणे असलेली कोणतीही रक्कम ही पोट कलम (१) मध्ये विहित केलेल्या रीतीने वसूल करता येईल त्यावेळी वसुलीच्या इतर कोणत्याही रीतीला बाध न आणता ती रक्कम त्या पोटकलमाच्या उपबंधानुसार वसूल करता येईल.

(३) या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या वसुलीच्या विविध रीतींचा,—

(एक) शासनाला येणे असलेल्या कर्जाच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यावर ; किंवा

(दोन) शासनाला येणे असलेल्या शास्तीच्या वसुलीकरता दावा दाखल करण्याच्या शासनाच्या अधिकारावर,

कोणताही परिणाम होणार नाही आणि या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही रीतीने ती रक्कम वसूल करावयाची असली तरीही केंद्र शासनाने अशा कोणत्याही कायद्याचा किंवा दाव्याचा अवलंब करणे कायदेशीर असेल.

**विवक्षित प्रकरणांमध्ये शाबितीचा भार.**

७१. (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या ज्या उपबंधाद्वारे परवानगीशिवाय एखादी कृती करण्यास कोणत्याही व्यक्तीला प्रतिषेध करण्यात आला असेल अशा कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल तिच्याविरुद्ध अभियोग किंवा कार्यवाही करण्यात येत असेल त्यावेळी आवश्यक ती परवानगी तिच्याकडे होती हे शाबीत करण्याचा भार तिच्यावर असेल.

(२) ज्यावेळी कलम ८ च्या पोटकलम (३) च्या उपबंधाच्या व्यतिक्रमणाबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध अभियोग किंवा कार्यवाही करण्यात आली असेल, त्यावेळी अशा व्यक्तीने संपादित केलेले परकीय चलन हे ज्या प्रयोजनासाठी चलन संपादित करण्यास परवानगी देण्यात आलेली असेल त्याच प्रयोजनाकरता वापरण्यात आले आहे, हे शाबीत करण्याचा भार तिच्यावर असेल.

(३) जर असे आढळून येईल किंवा शाबीत करण्यात येईल की, [२][पंधरा हजार रुपयांहून] अधिक मूल्याचे कोणतेही परकीय चलन कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात आहे, तर ते परकीय चलन वैधरीत्या तिच्या कब्जात आले हे शाबीत करण्याचा भार तिच्यावर असेल.

**विवक्षित प्रकरणांमध्ये दस्तऐवजासंबंधीची गृहीतके.**

७२. ज्यावेळी कोणताही दस्तऐवज,—

(एक) कोणत्याही बाबतीत या अधिनियमान्वये किंवा अन्य कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल किंवा सादर केला असेल, अथवा कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेतून किंवा नियंत्रणातून अधिगृहीत करण्यात आला असेल, किंवा

---

१ १९९३ चा अधिनियम २९, कलम ३४ द्वारे दाखल केले.

२ १९९५ चा अधिनियम २२, कलम ९९ द्वारे मूळ शब्दाऐवजी घातले (२६ मे, १९९५ रोजी व तेव्हापासून).

(दोन) कोणत्याही व्यक्तीकडून करण्यात आला असल्याचे अभिकथित असलेल्या अपराधाच्या अन्वेषणाच्या ओघात भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून (विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याकडून किंवा व्यक्तीकडून आणि अशा रीतीने यथोचितरित्या अधिप्रमाणित केलेला) प्राप्त झाला असेल ;

आणि असा दस्तऐवज तिच्याविरुद्ध अथवा तिच्या व तिच्याबरोबर जिच्याविरुद्ध संयुक्तपणे कार्यवाही करण्यात आली असेल अशा इतर व्यक्तीविरुद्ध या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत पुरावा म्हणून देण्यात आलेला असेल, त्यावेळी न्यायालय किंवा प्रकरणपरत्वे अभिनिर्णेता अधिकारी,—

(क) तद्विरुद्ध शाबीत करण्यात आले नाही तर असे गृहीत धरील की, सही व अशा दस्तऐवजाचा अन्य प्रत्येक भाग जो कोणत्याही विशिष्ट व्यक्तीच्या हस्ताक्षरात असल्याचे अभिप्रेत आहे किंवा ज्यावर कोणत्याही विशिष्ट व्यक्तीने सही केली असल्याचे किंवा तिच्या हस्ताक्षरात असल्याचे न्यायालयाला वाजवीरित्या गृहीत धरता येत असेल—त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरातील आहे, आणि निष्पादित केलेल्या किंवा साक्षांकित केलेल्या दस्तऐवजाच्या बाबतीत तो, ज्या व्यक्तीने अशा रीतीने निष्पादित करणे किंवा साक्षांकित करणे अभिप्रेत आहे, अशा व्यक्तीनेच निष्पादित किंवा साक्षांकित केला आहे;

(ख) एखादा दस्तऐवज यथोचितरित्या मुद्रांकित केलेला नसला तरीही, असा दस्तऐवज अन्यथा पुराव्यात ग्राह्य असता तर, तो पुराव्यात दाखल करून घेईल;

(ग) खंड (एक) खाली येणाऱ्या एखाद्या प्रकरणात तद्विरुद्ध शाबीत करण्यात आले नाही तर, अशा दस्तऐवजातील मजकुराची सत्यताही गृहीत धरील.

७३. (१) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या, निदेशांच्या किंवा आदेशांच्या प्रयोजनासाठी,— पूरक उपबंध.

(क) जी भारतातील रहिवासी होती परंतु आता तशी नाही, अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, रिझर्व्ह बँक आदेशाद्वारे, अशी व्यक्ती ज्या क्षेत्राची रहिवासी असल्याचे मानण्यात येईल ते क्षेत्र घोषित करू शकेल;

(ख) जी भारत सोडून जाईल अशा भारतातील रहिवासी असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, रिझर्व्ह बँक कोणत्याही बँकेला असा निदेश देऊ शकेल की, तो निदेश प्रत्याहृत केला जाईपर्यंत, त्या व्यक्तीच्या जमाखाती वेळोवेळी असलेली रक्कम आणि त्या बँकेच्या भारतामधील त्या निदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यालयात किंवा शाखेत तिच्या वतीने धारण करण्यात आलेली कोणतीही प्रतिभूती, यांच्यासंबंधात रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने असेल त्याखेरीज कार्यवाही करण्यात येणार नाही;

(ग) एखादी पेढी किंवा पेढीची शाखा ही सर्व बाबतीत, जणू काय अशी पेढी किंवा शाखा ती ज्या ठिकाणी स्थित आहे तेथील रहिवासी निगम निकाय असल्याचे समजण्यात येईल;

(घ) खंड (ग) च्या उपबंधाच्या अधीनतेने, कोणत्याही व्यवसायाची शाखा ही—मग तो व्यवसाय एखाद्या निगम निकायाद्वारे चालवला जाणारा असो किंवा अन्यथा असो—सर्व बाबतीत जणू काही ती शाखा ज्या ठिकाणी स्थित आहे तेथील रहिवासी निगम निकाय असल्याचे समजण्यात येईल ;

(ङ) कोणत्याही व्यवसायाच्या शाखेच्या नावे रकमा खर्ची टाकण्याच्या संबंधात या व्यवसायाच्या मुख्य कार्यालयाच्या किंवा अन्य कोणत्याही शाखेच्या बाजूने कोणतीही—पुस्तकी नोंद करणे किंवा विवरणपत्र करणे हे ऋणाची अशी अभिस्वीकृती असल्याचे मानण्यात येईल की, जिच्यामुळे ते मुख्य किंवा अन्य शाखा ज्या ठिकाणी आहे तेथील रहिवासी व्यक्तीच्या बाजूने अधिकार निर्माण होतो.

(२) केंद्र सरकार कोणतीही किंमत किंवा रक्कम भरण्याच्या संबंधात या अधिनियमात काही असेल तर, केंद्र शासनाने ती किंमत किंवा रक्कम भारतीय चलनाहून अन्यथा किंवा भारताखेरीज अन्यत्र भरणा करणे आवश्यक आहे असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

(३) बँक व्यवसायी, प्राधिकृत विक्रेते, नाणेवटी, रोखेदलाल, [1]* * * * किंवा ज्यांना रिझर्व्ह बँकेकडून त्यांच्या कामधंद्याच्या ओघात या अधिनियमानुसार काहीतरी करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे अशी व्यक्ती, त्यांच्याकडून प्रदान केले जाण्याच्या आणि अन्य कृती केली जाण्याच्या संबंधात रिझर्व्ह बँक, या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या उपबंधांचे पालन सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ तिला आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे निदेश देऊ शकेल.

(४) या संबंधात या अधिनियमात अंतर्भूत असतील अशा अन्य कोणत्याही सुस्पष्ट उपबंधांच्या अधीनतेने, ज्यावेळी अशा कोणत्याही उपबंधान्वये काहीतरी करण्यास रिझर्व्ह बँकेची परवानगी या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाद्वारे आवश्यक ठरवण्यात आली असेल त्यावेळी, रिझर्व्ह बँकेला,

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम ३५ द्वारे वगळण्यात आले.

अशा परवानगीकरता ज्या नमुन्यात अर्ज करण्यात येईल तो नमुना आणि अशा अर्जात जो तपशील अंतर्भूत करण्यात येईल तो तपशील विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु असे की, या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधान्वये परवानगीसाठी करावयाच्या अर्जाच्या संबंधात वेगवेगळे नमुने व वेगवेगळा तपशील विनिर्दिष्ट करता येईल.

[1][रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केल्या-बद्दल किंवा विवरणे सादर करण्यास चुकल्याबद्दल शास्ती.

७३क. कलम ५० व ५१ यांच्या उपबंधाना बाध न आणता जेव्हा कोणताही अधिकृत विक्रेता रिझर्व्ह बँकेने या अधिनियमान्वये दिलेल्या निदेशाचे उल्लंघन करील किंवा रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निदेशा-नुसार कोणतेही विवरण सादर करण्यास चुकेल तेव्हा, रिझर्व्ह बँक, त्या अधिकृत विक्रेत्यास आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर, त्यावर दहा हजार रुपयांपर्यंत असून शकेल इतका दंड आका-रील आणि असे उल्लंघन करणे चालू राहिल्यास त्याबाबतीत, जेवढे दिवस असे उल्लंघन होत राहील त्या प्रत्येक दिवसासाठी दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका अधिक दंड आकारू शकेल.]

प्रत्यायोजन.

७४. रिझर्व्ह बँकेला, केंद्र शासनाच्या पूर्वसंमतीने, आदेशाद्वारे,—

(एक) कलम ८ [2][९ किंवा १०] किंवा कलम १८ च्या पोटकलम (२) च्या खंड (क) च्या पोट-खंड (ख) किंवा कलम १८ चे पोटकलम (७) या खालील आपल्या कोणत्याही शक्ती किंवा काम कोणत्याही प्राधिकृत विक्रेत्याला ; किंवा

(दोन) कलम ८ किंवा ९ खालील आपल्या कोणत्याही शक्ती किंवा कामे कोणत्याही नाणेवटीला,

त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा निर्बंधाच्या, शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, प्रत्यायोजित करता येतील.

केंद्र सरकारची निदेश देण्याची शक्ती.

७५. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकार, रिझर्व्ह बँकेला वेळोवेळी त्याला योग्य वाटतील असे सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देऊ शकेल व या अधिनियमाखालील आपली कामे पार पाडताना रिझर्व्ह बँक अशा कोणत्याही निदेशांचे पालन करील.

केंद्र सरकारने किंवा रिझर्व्ह बँकेने या अधिनियमान्वये परवानगी किंवा लायसने देताना किंवा मंजूर करताना लक्षात घ्यावयाचे घटक.

७६. या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे उपबंधित करण्यात आले असेल त्याखेरीज केंद्र सरकार किंवा प्रकरणपरत्वे, रिझर्व्ह बँक या अधिनियमान्वये परवानगी किंवा लायसन देताना किंवा मंजूर करताना पुढील घटकांपैकी सर्व किंवा कोणतेही घटक विचारात घेईल, ते घटक असे :—

(एक) देशाच्या परकीय चलनाच्या साधनांचे संरक्षण;

(दोन) देशाला उपार्जित होणाऱ्या सर्व परकीय चलनाचा योग्य लेखा ठेवलेला असणे;

(तीन) देशाच्या परकीय चलनांच्या साधनांचा सामूहिक कल्याण साधेल अशाप्रकारे अधि-काधिक चांगला उपयोग केला जात असणे ; आणि

(चार) प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असतील असे इतर सुसंबद्ध घटक.

विवक्षित अधिकाऱ्यांनी सक्तवसुली अधिकाऱ्यांना सहाय्य करणे.

७७. पुढील अधिकाऱ्यांना या अधिनियमाची अंमलबजावणी करताना सक्तवसुली अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यास याद्वारे शक्ती प्रदान करण्यात व फर्माविण्यात येत आहे :—

(क) सीमाशुल्क विभागाचे अधिकारी;

(ख) केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी;

(ग) पोलीस अधिकारी;

(घ) कोणत्याही बंदरात किंवा विमानतळावर नेमलेले केंद्र किंवा राज्य शासनाचे अधिकारी;

(ङ) केंद्र सरकारने याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केले असतील असे कोणतेही केंद्र किंवा राज्य शासनाचे किंवा स्थानिक प्राधिकरणांचे अधिकारी.

वैध कार्यवाहीस आडकाठी.

७८. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, निदेश किंवा आदेश याअन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, केंद्र सरकारविरुद्ध किंवा रिझर्व्ह बँके विरुद्ध किंवा शासनाच्या किंवा रिझर्व्ह बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही शक्तींचा वापर करणाऱ्या किंवा कोणतीही कामे करणाऱ्या किंवा कोणतीही कर्तव्ये बजावणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही करता येणार नाही.

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम २६ द्वारे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे दाखल केले.

**नियम करण्याची शक्ती.**

७९. (१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी केंद्र सरकारला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमांद्वारे पुढील गोष्टी करता येतील :—

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ नमुने व त्यांच्या वापराची परिस्थिती विहित करणे;

(ख) प्राधिकृत विक्रेते व नाणेवटी यांनी व या अधिनियमान्वये जे काही करण्यासाठी परवानगी घेणे आवश्यक ठरवले आहे ते करण्यासाठी परवानगी मिळण्याकरता अर्ज करणाऱ्या व्यक्तींनी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(ग) या अधिनियमान्वये ज्या रीतीने चौकशी करता येईल व आदेश बजावता येतील ती रीत आणि अभिनिर्णेता अधिकारी किंवा अपील मंडळ यांच्या समोरील कार्यवाहीच्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

(घ) विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या उपबंधांच्या कोणत्याही व्यतिक्रमणाबद्दल दोषी असल्याचे आढळून आलेल्या व्यक्तींची नावे व इतर तपशील प्रकाशित करण्यासाठी उपबंध करणे ;

[1][(घघ) कलम ५२ च्या पोट-कलम (२) अन्वये अपील मंडळाकडे अपील करणाऱ्या व्यक्ती कडून देय असलेली फी विहित करणे.]

(ङ) जी या अधिनियमाखाली विहित करावयाची आहे किंवा करता येईल अशा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करणे.

(३) या अधिनियमाखाली करण्यात आलेला नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्राधीन असताना ठेवला जाईल, आणि जर पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र संपण्यापूर्वी दोन्ही सभागृहांचे, नियमात कोणतेही फेर-बदल करण्याबाबत एकमत झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबतीत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अडचणी निवारण्याची शक्ती.**

८०. या अधिनियमाचे उपबंध परिणामक करण्यामध्ये कोणतीही अडचण उद्भवली तर, केंद्र सरकार ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा उपबंधांशी विसंगत नसेल असे काहीही आदेशाद्वारे करू शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

८१. (१) विदेशी-विनिमय विनियमन अधिनियम, १९४७ (१९४७ चा ७) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही,—

(क) याद्वारे निरसित केलेल्या अधिनियमान्वये केलेले किंवा केल्याचे अभिप्रेत असलेले काहीही किंवा केलेली कोणतीही कार्यवाही (केलेला कोणताही नियम, काढलेली अधिसूचना, केलेले निरीक्षण, दिलेला आदेश किंवा काढलेली नोटीस किंवा मंजूर केलेले कोणतेही लायसन, दिलेली परवानगी, प्राधिकार किंवा सूट किंवा निष्पादित केलेला कोणताही दस्तऐवज किंवा संलेख किंवा दिलेले कोणतेही निदेश किंवा केलेली कोणतीही कार्यवाही किंवा निर्णीत केलेले कोणतेही अधिहरण किंवा लादलेली शास्ती किंवा द्रव्यदंड धरून) जोवर ती या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नाही तोवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधाखाली करण्यात आल्याचे मानले जाईल.

(ख) या अधिनियमाच्या कलम ६० चे उपबंध याद्वारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या, निदेशाच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही उपबंधाच्या व्यतिक्रमणाच्या संबंधात लागू होतील.

(ग) याद्वारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाच्या कलम २३ च्या पोट-कलम (२) अन्वये परकीय चलन विनियमन अपील मंडळाकडे करण्यात आलेले, परंतु या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निकालात न काढलेले कोणतेही अपील आणि याद्वारे निरसित करण्यात आलेल्या

---

१. १९९३ चा अधिनियम २९, कलम ३८ द्वारे नवीन पोट-कलम दाखल केले.

अधिनियमाच्या कलम २३ अन्वये देण्यात आलेल्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध उक्त मंडळाकडे करता येईल असे कोणतेही अपील, या अधिनियमान्वये घटित अपील मंडळाच्या कोणत्याही सदस्याकडून या अधिनियमाच्या कलम ५२ च्या पोट-कलम (६) च्या उपबंधानुसार, निकालात काढले जाऊ शकेल.

(घ) परकीय चलन विनियमन अपील मंडळाच्या कोणत्याही नियमाविरुद्ध किंवा आदेशा-विरुद्ध याद्वारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाच्या कलम २३ च्या पोट-कलम (३) किंवा पोट कलम (४) खालील प्रत्येक अपील हे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दाखल करण्यात आले नसेल तर, ते अशा प्रारंभापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात येईल :

परंतु असे की, जर उक्त साठ दिवसांचा कालावधी समाप्त होण्याच्या आत अपील दाखल करण्यास प्रतिबंध करणारे पुरेसे कारण अपिलदाराकडे होते, याबद्दल उच्च न्यायालयाचे समाधान झाले असल्यास ते उक्त कालावधीच्या समाप्तीनंतरदेखील असे अपील विचारार्थ स्वीकारू शकेल.

(३) पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या विशिष्ट गोष्टीमुळे निरसनाच्या परिणामाच्या संबंधात सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याचे कलम ६ सर्वसाधारणपणे लागू होण्यास बाधा उत्पन्न होते किंवा त्यावर परिणाम होतो, असे समजण्यात येणार नाही.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई